cmyk

## संपादकीय

### वाय-फाय आहे पण पाणी नाही?

देशात आणि राज्यात विकासाची व्याख्या गेल्या काही वर्षांत झपाट्याने बदलली आहे. शहरांमध्ये स्मार्ट सिग्नल, मोफत वाय-फाय, डिजिटल सेवा, सीसीटीव्ही नेटवर्क, मेट्रो, एक्सप्रेसवे आणि अत्याधुनिक इमारती यांना विकासाचे प्रतीक मानले जाऊ लागले आहे. मात्र, २०२६ च्या उन्हाळ्याने एक अस्वस्थ करणारा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहेजर नागरिकांच्या नळात पाणीच येत नसेल, तर हा विकास नेमका कोणासाठी आहे?


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-१०२ | गुरूवार दि.०२ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### बोगस गोशाळांचे अनुदान पूर्णपणे बंद होणार

धुळे : "महाराष्ट्र शासनाकडून गोमातेच्या संवर्धन, संरक्षण आणि विकासासाठी प्राप्त झालेल्या निधीचा विनियोग केवळ निर्दिष्ट कामांसाठीच केला जाईल. या निधी खर्चातील पारदर्शकता अधिक वाढवून गोसेवा आयोगाचा कारभार आणखी गतिमान करण्याचा आमचा मानस आहे. तसेच, राज्यभरातील गोशाळांचे अचूक सर्वेक्षण करून बोगस गोशाळांचे अनुदान पूर्णपणे बंद केले जाईल," अशी स्पष्टोक्ती महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष डॉ. शेखर मुंदडा यांनी दिली. राज्यमाता गोमाता संवाद यात्रा अंतर्गत धुळे व नंदुरबार जिल्हा गोशाळा संचालक, गोसेवक व पशुपालक संवाद सभा बुधवार, दि. २४ रोजी धुळ्यातील मालेगाव रोडवरील खान्देश गोशाळा येथे सायंकाळी उत्साहात पार पडली. याप्रसंगी ते बोलत होते.

### 'एसटी'च्या तीर्थाटन योजनेचे खासगीकरण

ठाणे : राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे एसटी संगे तीर्थाटन' योजनेला व्यावसायिक स्वरूप देण्यासाठी खासगी पर्यटन संस्थांच्या सहभागाला तत्त्वत: मान्यता देण्यात आली आहे. हा खासगीकरणाचा प्रयोग दोन वर्षे प्रयोगिक तत्त्वावर राबविण्याच्या निर्णयामुळे राज्यातील हजारो भाविकांना सुरक्षित, किफायतशीर आणि सर्वसमावेशक तीर्थयात्रेची सुविधा उपलब्ध होऊन एसटी महामंडळालाही अतिरिक्त महसूल मिळेल, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले की, नव्या धोरणानुसार तीर्थाटन व धार्मिक सहलींचे नियोजन, निवास, भोजन, स्थानिक पर्यटन, मार्गदर्शक, टोल, पार्किंग, प्रवेश शुल्क आदी सर्व पूरक सुविधा खासगी पर्यटन संस्थांकडून पुरविण्यात येतील.

### खा. श्रीकांत शिंदे यांच्या ताफ्याला काळे झेंडे

नांदेड : शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे खा. श्रीकांत शिंदे यांच्या नांदेड दौऱ्यादरम्यान त्यांच्या ताफ्याला उबाठा (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी अंजनखेडा गावात काळे झेंडे दाखवत निषेध व्यक्त केला. यावेळी कार्यकर्त्यांनी ताफा अडवण्याचा प्रयत्न केल्याने काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. खा. शिंदे यांच्या ताफ्यासमोर उबाठा शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत निषेध नोंदविला. यावेळी फुटीर खा. नागेश पाटील आष्टीकर यांच्या विरोधातही घोषणाबाजी करण्यात आली. पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करून आंदोलकांना बाजूला करत ताफ्याला मार्ग मोकळा करून दिला. या घटनेमुळे काही काळ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०१ जुलै २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५३.५० क्विंटल | २,३९० | २,६२० | २,५१२ |
| ज्वारी/हायब्रिड: ११५.५० क्विंटल | १,७०० | ४,६०० | २,८८७ |
| मका/लोकल: ५२.५० क्विंटल | २,२०० | २,२०० | २,२०० |
| तूर : ६.५० क्विंटल | ५,००० | ७,३०० | ६,५०० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |
| बाजरी: ७२.०० क्विंटल | २,४४० | ३,००० | २,६३५ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:७.५० क्विंटल | ६,५०० | ६,६०० | ६,५५० |
| हरभरा: ३.५० क्विंटल | ४,२०० | ५,३९१ | ४,९८७ |

# बोगस पीक विमाधारकांना शासनाचा मोठा दणका

## आधार क्रमांक पाच वर्षांसाठी काळ्या यादीत, फसवणुकीचे गुन्हेही होणार दाखल

मुंबई । प्रतिनिधी

**खरीप हंगाम २०२६ साठी पीक विमा योजनेची अर्ज प्रक्रिया मंगळवार (१ जुलै) पासून सुरू झाली असून, शेतकऱ्यांना ३१ जुलैपर्यंत अर्ज दाखल करता येणार आहेत. यासोबतच हवामानावर आधारित फळ पीक विमा योजनेअंतर्गत मृग बहारासाठीही शासनाने योजना लागू करण्यास मंजुरी दिली आहे. नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट तसेच इतर प्रतिकूल हवामानामुळे होणाऱ्या नुकसानापासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण मिळावे, हा या योजनेचा उद्देश आहे.**

गेल्या काही वर्षांत पीक विमा योजनेत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार उघडकीस आले आहेत. प्रत्यक्षात शेती न करता, पिकाची लागवड न करता किंवा चुकीची माहिती देऊन काही जणांनी बोगस पीक विमा काढून विमा रकमेवर डल्ला मारल्याचे प्रकार समोर आले होते. त्यामुळे शासनाला मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले असून, पात्र शेतकऱ्यांच्या हक्काच्या लाभावरही त्याचा परिणाम झाला आहे. याच पार्श्वभूमीवर यंदाच्या खरीप हंगामापासून शासनाने अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. बोगस पीक विमा काढणाऱ्या व्यक्तींचा आधार क्रमांक थेट पाच वर्षांसाठी ब्लॅकलिस्ट करण्यात येणार आहे. ज्या लाभार्थ्यांचा आधार क्रमांक काळ्या यादीत समाविष्ट केला जाईल, त्यांना पुढील पाच वर्षे शासनाच्या कोणत्याही कृषी




किंवा इतर कल्याणकारी योजनांचा लाभ घेता येणार नाही. यामध्ये कृषी अनुदान, पीक विमा, बियाणे व खत अनुदान, सिंचन योजना तसेच इतर शासकीय लाभांचाही समावेश असणार आहे.ङ्घयाशिवाय, प्रत्यक्ष शेत पाहणी, उपग्रह छायाचित्रे, महसूल व कृषी विभागाच्या पडताळणीत बोगस पीक विमा उतरविल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांविरुद्ध थेट फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. अशा प्रकरणांमध्ये केवळ विमा रक्कम वसूल केली जाणार नाही, तर संबंधितांवर फौजदारी कारवाईही केली जाणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. राज्यातील पीकविमा योजनेचा मोठा आर्थिक भार शासन उचलत असून शेतकऱ्यांच्या विमा हप्त्यापोटी हजारो कोटी रुपयांचा निधी शासनाकडून जमा करण्यात आला आहे. त्यामुळे या निधीचा गैरवापर होऊ नये आणि खऱ्या अर्थाने ▶▶ पान २ वर

# मुंबईत पावसाचा हाहाकार!

## मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा



मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रात मान्सून चांगलाच सक्रिय झाला असून गेल्या २४ तासांत मुंबईसह उपनगरे, ठाणे, नवी मुंबई आणि कोकणात पावसाने अक्षरशः हाहाकार उडाला. मुसळधार पावसामुळे मुंबई आणि उपनगरांतील रस्ते वाहतूक आणि लोकल सेवेवर मोठा परिणाम झाला असून सखल भागात २ ते ३ फुटांपर्यंत पाणी साचले आहे. अनेक ठिकाणी शाळा आणि इमारतींमध्ये ▶▶ पान २ वर

### मराठवाडा आणि विदर्भाला ऑरेंज अलर्ट

हवामान विभागाने विदर्भ आणि मराठवाड्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, अकोला आणि बुलडाणा या ५ जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे, तर उर्वरित विदर्भाला येलो अलर्ट देण्यात आला आहे.

# २३ राजकीय पक्षांचे एसआयआर वरून सरन्यायाधीशांना पत्र

## निवडणूक आयोगाच्या पक्षपाती कारभारावर गंभीर आरोप, इंडिया आघाडीबाहेरील पक्षांचाही समावेश

दिल्ली । वृत्तसंस्था

देशातील २३ विरोधी पक्षांनी देशाच्या सरन्यायाधीशांना एक संयुक्त पत्र लिहून, निवडणूक आयोगाच्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकनावर (एसआयआर) आणि निवडणुकीशी संबंधित इतर मुद्द्यांवर चिंता व्यक्त केली आहे. निवडणूक आयोगावर पक्षपातीपणाचा गंभीर आरोप केला आहे. हे पत्र ८ जून रोजी झालेल्या इंडिया आघाडीतील २५ विरोधी पक्षांच्या बैठकीनंतर काही आठवड्यांतच आले आहे. त्या बैठकीत, पक्षांनी एकता कायम ठेवण्याची शपथ घेतली आणि एसआयआर व निवडणुकांच्या निष्पक्षतेच्या मुद्द्यावर सरन्यायाधीशांना संयुक्त पत्र पाठवण्याचा निर्णय




घेतला. यामध्ये द्रविड मुन्नेत्र कळघम (डीएमके), आम आदमी पार्टी (आप) आणि एका अपक्ष खासदारासारख्या इंडिया आघाडीबाहेरील पक्षांचाही समावेश आहे.

आघाडीच्या झालेल्या बैठकीला डीएमके आणि आप उपस्थित नसले तरी, आता दोन्ही पक्षांनी या संयुक्त पत्रावर ▶▶ पान २ वर

### बंगालमध्ये २७ लाख मतदार वंचित

एकट्या पश्चिम बंगालमध्येच, अंदाजे २७ लाख मतदार मतदान करू शकले नाहीत, कारण त्यांची प्रकरणे न्यायालयीन न्यायाधिकरणांमध्ये अपीलसाठी प्रलंबित होती. एसआयआर लागू होऊन एक वर्ष उलटले तरी, मतदार यादीत आढळलेल्या कथित बेकायदेशीर स्थलांतरितांची संख्या निवडणूक आयोग निश्चित करू शकलेला नाही. दुसरीकडे, एसआयआर अंतर्गत ज्यांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत, त्यांना विविध कल्याणकारी योजनांअंतर्गत लाभ दिले जात नाहीत. गेल्या महिन्यात, सर्वोच्च न्यायालयाने एसआयआरला वैध ठरवणाऱ्या आपल्या आदेशात स्पष्ट केले की, निवडणूक आयोग केवळ मतदार यादीत समावेश करण्याच्या उद्देशानेच नागरिकत्वाची पडताळणी करू शकतो, त्यापलीकडे नाही.

# व्यावसायिक गॅस सिलिंडर १८३ रुपयांनी स्वस्त

दिल्ली । वृतसंस्था

जुलै महिन्याची सुरुवात खानावळ, हॉटेल आणि केटरिंग सेवा देणाऱ्या व्यावसायिकांसाठी दिलासा देणारी ठरली आहे. गेल्या काही महिन्यांतील दरवाढीनंतर तेल विपणन कंपन्यांनी १९ किलो वजनाच्या व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात १८३.५० रुपयांची कपात केली आहे. यामुळे दिल्लीत अशा सिलिंडरचा किरकोळ दर ३,११३.५० रुपयांवरून २,९३० रुपयांवर आला. नवीन दर १ जुलैपासून लागू आहेत.



१४.२ किलो वजनाच्या घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. त्याचबरोबर सरकारने डिझेल विक्रीवरील मर्यादा हटवली आहे. यामुळे वाहनचालक, शेतकरी आणि वाहतूक क्षेत्राला मोठा दिलासा मिळाला आहे. ▶▶ पान २ वर


# थलपती विजय यांचे सरकार २ महिन्यांतच पाडण्याचा कट

## ● डर्टी गेमचा गुप्तचर विभागाकडून पर्दाफाश?

चेन्नई । वृत्तसंस्था

**तामिळनाडूच्या गुप्तचर विभागाने एका मोठ्या राजकीय कटाचा पर्दाफाश केल्याचा दावा केला आहे. या कटानुसार, अभिनेते ते नेते बनलेल्या थलपती विजय यांच्या टीव्हीके पक्षाचे नवे कोरे सरकार पाडण्याचा प्लान होता. विशेष म्हणजे या सरकारला स्थापन होऊन अजून दोन महिनेही पूर्ण झालेले नाहीत. गुप्तचर विभागाच्या माहितीनुसार, टीव्हीकेच्या १५ आमदारांना एकाच वेळी राजीनामा द्यायला लावून सरकार अल्पमतात आणणे आणि ते पाडणे, असा या कटाचा मुख्य उद्देश होता.**

उथंगरई येथील टीव्हीके आमदार एन. इलैयाराजा यांनी पोलिसांत तक्रार दाखल केल्यानंतर हा खळबळजनक खुलासा झाला. विधानसभा अध्यक्ष जेसीडी प्रभाकर यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव आणण्यासाठी एका कन्सल्टन्सी फर्मच्या व्यक्तीने




आपल्याला ३५ कोटी रुपयांची मोठी लाच देऊ केल्याचा आरोप आमदारांनी केला आहे. इतकेच नाही तर तोंड बंद ठेवण्यासाठी त्यांना धमकावण्यातही आले होते. ही बातमी समोर आल्यानंतर तामिळनाडूच्या राजकारणात प्रचंड खळबळ उडाली आहे. या हाय-प्रोफाइल प्रकरणात आतापर्यंत तीन जणांना अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या लोकांचे धागेदोरे डीएमके ▶▶ पान २ वर

# मयत विलास घुले कुटूबीयांचे पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन

केज। प्रतिनिधी

तालुक्यातील टाकळी येथील विलास घुले यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी, या मागणीसाठी मृताचे भाऊ रमेश नवनाथ घुले व त्यांच्या कुटुंबियांनी बुधवारी दि.१ जुलै रोजी पाण्याच्या टाकीवर चढून तीव्र आंदोलन केले. या आंदोलनामुळे काही काळ येथे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र प्रशासनाने यात वेळीच हस्तक्षेप करीत कारवाईचे आश्वासन दिल्याने हे आंदोलन थांबविण्यात आले.

दिनांक २१ जून २०२६ रोजी विलास घुले यांची कट रचून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी केज पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल असून,



पोलीस तपास सुरू आहे. या प्रकरणात काही आरोपींना अटक झाली असली तरी, मुख्य सूत्रधार व इतर आरोपी अद्याप मोकाट असल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे. हत्येच्या कटात सामील असलेला आरोपी सौरभ बजरंग सोनवणे याला तात्काळ अटक करावी. या प्रकरणातील सर्व आरोपींवर मोका अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी. सोशल ▶▶ पान २ वर

# प्रकाशदादा हे वागणं बरं नव्हं...!

## तोहीद खान हत्या प्रकरणी मुंडेंच्या मागणीला प्रकाश सोळंकेंचा आक्षेप

बीड-मुंबई । प्रतिनिधी

**परळीतील तरुण तोहीद खान याच्या हत्याप्रकरणाने राज्य विधिमंडळाच्या सभागृहात बुधवारी सखोल चौकशीची आणि पीडित गरीब कुटुंबाला आर्थिक मदत देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा मंत्री धनंजय मुंडे यांनी केली. मात्र, आ.प्रकाश सोळंके यांनी नियमांवर बोट ठेवत, हे प्रकरण मांडण्यावर आक्षेप घेतल्याचे दिसून आले. प्रकाशदादा यांची ही भुमिका अत्यंत आश्चर्यकारक स्वरूपाची दिसून आली. मृत तोहीद देखील माणूसच**





**होता, त्याला न्याय मिळालाच पाहिजे. म्हणूनच प्रकाशदादा हे वागणं बरं नव्हं अशा प्रतिक्रिया आता उमटत आहेत.**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी परळी आणि बीड जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीवर सभागृहात बुधवारी गंभीर चिंता व्यक्त केली. तोहीद खान हत्या प्रकरणात नशेखोरीचा मुद्दाही त्यांनी लावून धरला. "हे कुटुंब अत्यंत गरीब आहे, त्यामुळे शासनाने तातडीने या प्रकरणाची सखोल चौकशी करावी आणि पीडित कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी," अशी आग्रही मागणी मुंडे यांनी केली. मुंडे यांची मागणी सुरू असतानाच, बीड जिल्ह्यातीलच माजलगावचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी अचानक आक्षेप घेतला. "धनंजय मुंडे यांनी हा प्रश्न कोणत्या नियमाच्या आधारे उपस्थित केला? नियमात नसताना हा प्रश्न कसा काय मांडला जातो?" असा सवाल उपस्थित करत सोळंकेंनी या प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह




उपस्थित केले. यामुळे सभागृहात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. सभागृहात निर्माण झालेला गोंधळ पाहून सभापतींनी तत्काळ हस्तक्षेप केला. सभापतींनी स्पष्ट केले की, "हा मुद्दा अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीनेच उपस्थित करण्यात ▶▶ पान २ वर

### दादांविषयी नाराजीचा सूर

एकाच जिल्ह्यातील दोन बड्या नेत्यांमध्ये, तेही एका तरुणाच्या हत्येसारख्या संवेदनशील मुद्द्यावर झालेल्या या वादामुळे राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देणे आवश्यक असताना आणि हा मुद्दा चर्चेत येण्याची गरज असताना, नियमांच्या पेचात अडकलेले राजकारण पाहून जिल्ह्यात विशेषतः मुस्लिम समाजात आ. प्रकाश सोळुंके यांच्या विषयी नाराजी व्यक्त होताना दिसत आहे.

cmyk

cmyk



## अग्रलेख

# वाय-फाय आहे पण पाणी नाही? विकासाच्या दाव्यांमागचे कटू वास्तव

देशात आणि राज्यात विकासाची व्याख्या गेल्या काही वर्षांत झपाट्याने बदलली आहे. शहरांमध्ये स्मार्ट सिग्नल, मोफत वाय-फाय, डिजिटल सेवा, सीसीटीव्ही नेटवर्क, मेट्रो, एक्सप्रेसवे आणि अत्याधुनिक इमारती यांना विकासाचे प्रतीक मानले जाऊ लागले आहे. मात्र, २०२६ च्या उन्हाळ्याने एक अस्वस्थ करणारा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहेजर नागरिकांच्या नळात पाणीच येत नसेल, तर हा विकास नेमका कोणासाठी आहे?

महाराष्ट्रातील अनेक भागांनी २०२६ मध्ये पाणीटंचाईचा तीव्र सामना केला. राज्य सरकारलाच अनेक गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागला. पुणे आणि पिंपरी-चिंचवडसारख्या आर्थिकदृष्ट्या सक्षम शहरांमध्येही कमी पर्जन्यमान, धरणांतील घटता पाणीसाठा आणि वाढती लोकसंख्या यामुळे पाणीपुरवठ्यावर ताण निर्माण झाला. हवामानातील बदल, वाढते तापमान आणि अनियमित मान्सून ही केवळ पर्यावरणीय आव्हाने राहिलेली नाहीत; ती आता प्रशासन, अर्थव्यवस्था आणि सार्वजनिक आरोग्याची गंभीर समस्या बनली आहेत. पुणे शहराला पाणी पुरवणाऱ्या खडकवासला जलसाखळीतील चार धरणांवर लाखो नागरिक अवलंबून आहेत. पावसातील चढ-उतार आणि वाढती मागणी यामुळे दरवर्षी पाणी वापराचे नियोजन हा महत्त्वाचा विषय ठरतो. दुसरीकडे, शहराचा विस्तार झपाट्याने होत असताना जलवाहिन्यांमधील गळती, अनधिकृत जोडण्या, भूजलाचा अतिवापर आणि पुनर्वापरित पाण्याचा मर्यादित वापर यांसारख्या प्रश्नांकडे अपेक्षित गांभीर्याने पाहिले जात नाही. आज अनेक शहरांमध्ये सार्वजनिक ठिकाणी मोफत वाय-फाय उपलब्ध आहे, परंतु अनेक वस्त्यांमध्ये नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागते. डिजिटल सुविधा महत्त्वाच्या आहेतच; परंतु त्या मूलभूत नागरी सेवांची जागा घेऊ शकत नाहीत. इंटरनेटशिवाय काही काळ जगता येऊ शकते, पण सुरक्षित पिण्याच्या पाण्याशिवाय नाही. विकासाचा केंद्रबिंदू माणूस असेल, तर त्याच्या सर्वात मूलभूत गरजा प्रथम पूर्ण होणे आवश्यक आहे. भारताची लोकसंख्या वाढत आहे, शहरीकरण वेगाने होत आहे आणि हवामान बदलाचा परिणाम अधिक तीव्र होत आहे. अशा परिस्थितीत जलसंधारण, सांडपाण्याचे पुनर्प्रक्रियन, पावसाच्या पाण्याचे संकलन, गळती नियंत्रण, जललेखापरीक्षण आणि भूजल पुनर्भरण यांना प्राधान्य देणे अपरिहार्य आहे. केवळ नवीन धरणे बांधून प्रश्न सुटणार नाही; उपलब्ध पाण्याचे वैज्ञानिक आणि कार्यक्षम व्यवस्थापन करणे अधिक महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर विकासाचे मोजमाप नव्याने करण्याची वेळ आली आहे. शहरात किती वाय-फाय हॉटस्पॉट आहेत, किती डिजिटल सेवा सुरू झाल्या किंवा किती भव्य प्रकल्प उभे राहिले, यापेक्षा प्रत्येक घरात नियमित, सुरक्षित आणि पुरेसा पाणीपुरवठा होतो का, प्रत्येक नागरिकाला स्वच्छता आणि आरोग्याच्या मूलभूत सुविधा मिळतात का, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. विकास हा घोषणांमधून नव्हे तर नागरिकांच्या दैनंदिन जीवनातून दिसला पाहिजे. नळ कोरडे असताना डिजिटल प्रगतीची भाषा अपुरी वाटते. आधुनिक शहराची खरी ओळख वेगवान इंटरनेटमध्ये नसून, विश्वासार्ह पाणीपुरवठा, सक्षम पायाभूत सुविधा आणि जीवनमान उंचावणाऱ्या सार्वजनिक सेवांमध्ये असते. कारण शेवटी, वाय-फाय हा आधुनिक जीवनाचा भाग असू शकतो; पण पाणी हा जीवनाचा आधार आहे. विकासाचा पाया डिजिटल नसून मानवी गरजांवर उभा असला पाहिजे.

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्याकडून लाच घेतानी कनिष्ठ लिपिक पकडला

**जालना । प्रतिनिधी**

**ऑगस्ट २०२५ मध्ये सरळ सेवे भरतीमध्ये रुजू झालेले रमेश खरे कनिष्ठ लिपिक यांना आज लाच घेतानी पकडले .आरोपीला आज न्यायालय मध्ये हजर केले असता एक दिवसांचा पोलीस कोठडी देण्यात आली.**




सेवानिवृत्त तक्रारदार यांचे अर्जित रजेच्या फरकाचे बील काढुन देण्यासाठी रमेश कल्याण खरे, वय ३४ वर्ष पदः- कनिष्ठ लिपिक, कार्यालय जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, जालना यांनी ३०००/-रु. लाचेची मागणी करुन सदर रक्कम स्विकारली असता त्यांना पकडण्यात आले. जालना यांचे कार्यालयात आलोसे यांच्या कक्षात. ३०००/-रुपये तक्रारदार हे मृद व जलसंधारण विभाग, जालना येथुन सेवानिवृत्त झाले आहे. त्यांनी तक्रार दिली की, त्यांचे तीनशे दिवसांचा अर्जित रजेचा फरकाचे बील रक्कम ३,०४६३०/-रुपये सहायक जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंदारण विभाग जालना यांचे कार्यालयात प्रलंबित होते. नमुद बिलाची रक्कम तक्रारदार यांना काढुन देण्यासाठी लिपिक रमेश खरे, कार्यालय जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, जालना यांनी ३०००/-रुपयांच्या लाचेची मागणी करत आहे. अशा आशयाची तक्रार जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिली. रमेश खरे, यांनी तक्रारदार यांना त्यांचे अर्जित रजेच्या फरकाचे बील रक्कम ३,०४६३०/- रुपये काढुन देण्यासाठी ३०००/- रुपये लाचेची पंचासमक्ष मागणी करून ती स्विकारण्याचे कबुल केले. लाचलुचपत प्रतिंधक विभाग जालना चे पोलीस निरीक्षक शरदचंद्र रोडगे यांनी व त्यांच्या पथकातील अंमलदार यांनी ताब्यात घेतले. आरोपीला आज न्यायालय मध्ये हजर केले असता एक दिवसांचा पोलीस कोठडी देण्यात आली.

# पंधरा दिवसानंतरही जांभूळवाडी जि.प.शाळेला कुलूप?

## बेजबाबदार अधिकारी मस्तीत विद्यार्थी मात्र रस्त्यावर ?

**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी तालुक्यातील एकनाथवाडी येथील जांभुळवाडी ही वस्ती शाळा शाळा उघडल्याचा दिनांक १५ जून २०२६ पासून पंधरा दिवसापासून कुलूप लावल्याने बंद अवस्थेत असून विद्यार्थ्यांना जांभुळवाडी येथील रस्त्यावर बसावे लागत असल्याने संतापाची लाट निर्माण झाली असून धक्कादायक बाब म्हणजे २००० वर्षी गृहस्थ सुदाम नामदेव खेडकर यांनी जांभुळवाडी येथील वस्ती शाळेसाठी स्वतःच्या मालकीची तीन गुंठे जागा दिली परंतु हे देत असताना गट नंबर ३४ फेरफार नंबर १९१७ जागेमध्ये बांधकाम केले ग्रामपंचायत मध्ये वस्ती शाळेसाठी जागेचे बक्षीसपत्र हस्तांतरण करत असताना सुदाम खेडकर यांच्या पत्नी आसराबाई नामदेव खेडकर यांच्या नावे बनावट बक्षीस पत्र केल्याची माहिती आहे याचाच अर्थ जिल्हा परिषद अहिल्यानगर गट नंबर ६३३ फेरफार नंबर ६०६ गट नंबर दाखवून दुसऱ्या गट नंबर ३४ मध्ये वस्ती शाळेचे बांधकाम करून कागदपत्रांची हेराफेरी करून गट नंबर ३४ मध्ये अतिक्रमित वस्ती शाळा बांधली असल्याचे निष्पन्न झाले आहे यामुळे गेले २६ वर्ष गृहस्थ सुदाम नामदेव खेडकर हे त्यांच्या मागण्या मान्य न झाल्यामुळे शाळेला कुलूप लावत असल्याने प्रतिवर्षी हा वाद विकोपाला जात असल्याने यामध्ये जांभुळवाडी वस्ती शाळेवरील चिमुकल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे या घटनेस जबाबदार गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड यांच्यावर शिस्तभंगाची व निलंबनाची कारवाई करण्याची मागणी होत आहे.

**एकनाथवाडी गावातील ग्रामपंचायत मधील शहादेव खेडकर नावाचा ग्रामरोजगार सेवक ज्याने एमआरजीएस योजनेतील गाय गोठा विहीर योजनेचा गावातील लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली प्रति लाभार्थ्यांकडून वीस हजार रुपये कमिशन घेतल्याच्या तक्रारी आहेत ग्रामपंचायत मधील अनेक कामात व गैरव्यवहारात शहादेव खेडकर चा हात असल्याचे बोलले जात आहे ग्रामरोजगार सेवक शहादेव खेडकर याच्यावर तातडीने निलंबनाची कारवाई करण्याची मागणी होत आहे.**

तूर्तास जांभुळवाडी जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांना एकनाथवाडी येथील जि.प. शाळेत पाठवण्याची व्यवस्था केली आहे ग्रहस्थ सुदाम खेडकर यांना विनंती केली परंतु जांभुळवाडी शाळेचे बांधकाम २००६ या वर्षी झाले असल्याने तत्कालीन गाव पुढाऱ्यांनी व काही दलाल अधिकाऱ्यांनी त्यांची फसवणूक केल्याने ते शाळेचे कुलूप उघडण्यास असमर्थ आहेत या संपूर्ण प्रकरणाचा वस्तुनिष्ठ अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठवला जाणार असून यामध्ये तत्कालीन ग्रामसेवक ठेकेदार सरपंच उपसरपंच व बेजबाबदार अधिकारी या सर्वांवर फौजदारी गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**- संजय लखवाल (बिडीओ पाथर्डी )**

# व्यापारी महासंघ महिला आघाडीच्या कार्य राज्यात अव्वल-हस्तीमल बंब

**जालना। प्रतिनिधी**

व्यापारी महासंघात महिलांना आरक्षण देणारा जिल्हयातील सर्व तालुक्यात, ग्रामीण भागात वारंवार दौरे संपर्क करून गावा-गावात लहान सहान उद्योग व्यवसाय करणारी गरजू महिलांना एकजुट संघटीत करून जवळपास ४० महिलांची संघटना उभारून इच्छुक महिलांचे राज्यात प्रथमच अभुतपुर्व अधिवेशन घेऊन त्यांची उद्योग वाढीसाठी प्रोत्साहान मदत करण्याचे उद्देशाने शासकीय अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व कार्यशाळा घेऊन त्यांना शासनाची योजना, अनुदान, नाममात्र व्याजाने कर्ज मिळून देणारा आपला जालना जिल्हा राज्यात एकमेव जिला आहे. जालना जिला व्यापारी महासंघ महिला आघाडीच्या कार्य राज्यात अव्वल आहे, असे बंब म्हणाले. व्यापारी महासंघ जिल्हा जालना महिला-पुरुष पदाधिकाऱ्यांची बैठक व सत्कार समारोह मराठवाडा विभागीय महिला अध्यक्षा सौ. सिता मोहिते पाटील यांचा भोलेश्वर भाजीपाला, गृहउद्योग आँवला कॅण्डी, नर्सरी, सिंधीकाळेगाव येथे दि. ३० जून २०२६ रोजी घेण्यात आले. प्रारंभी मराठवाडा विभागीय अध्यक्ष हस्तीमलजी बंब यांना महाराष्ट्र शासन (उद्योग मंत्रालय) मुंबई येथे राज्यात प्रथम पुरस्कार व सतिष पंच यांची जे.पी.सी. बँक चा चेअरमन पदी निवड आणि महिला आघाडीची मराठवाडा विभागीय सचिवा सौ. आनंदी अय्यर यांना पुरस्कार मिळ्याल्या बदूल भव्य सत्कार करण्यात आले. सत्कारचा उत्तर देतांना पुढे बंब म्हणाले मागील दिवसात सौ. मोहिते, जिल्हाध्यक्षा सौ. प्रिया जोशी यांना उत्कृष्ठ कार्या बदल पुरस्कार देण्यात आले होते. आपल्या येथील महिला आघाडीचा पॅर्टन वर राज्यातील इतर जिल्हयात सुध्दा कार्य असला पाहिजे. महिलांनी चुलमुल पर्यंत न



राहता स्वतःचा उद्योग उभारून गरजूना काम द्यावा. महिलांनी अबला नाही सबला म्हणून पुढे यावे. जसे नागरिकांना कर भरणे आवश्यक आहे तसे नागरिक सुविधा सुध्दा मिळाली पाहिजे. शहरात ठीक-ठीकाणी पालिकेने मुत्र्या उभारली आहे पाणी व स्वछता नसल्याने लोग उघड्यावर शौचालय करतात, हे महिलांसाठी फार अवघड आहे. महापौर, उपमहापौर पालिकेत निवेदन देण्यात आले आहे. पालिकेने जागा दिल्यास शहरात अत्याधुनिक सुलभ शौचालय उभार असे बंब म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुखदेव बजाज यांनी केले, राज्य उपाध्यक्ष सतिष पंच यांनी सर्वपरी सहकार्य करु, सौ. अय्यर यांनी महिलासाठी शासकीय योजना तळा गळा पर्यंत पोहचु, सौ. मोहिते म्हणाल्या जालना पॅर्टन संपूर्ण मराठवाड्यात राबवु असे उद्गार व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी प्रविण मोहता, राम मोहिते, ॲड. सुब्रह्मण्यम अय्यर, प्रमोद जोशी इ. परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन गोंविद साखला यांनी केले, तर आभार जिल्हा महिला अध्यक्षा सौ. प्रिया जोशी यांनी मांडले.

# नानाभाऊ हजारे यांची सांगली' उपशिक्षणाधिकारी ऋषिकेश शेळके परभणी'ला अधीक्षकपदी नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

जिल्हा तांत्रिक सेवेतील विस्तार अधिकारी या संवर्गातून महाराष्ट्र शिक्षण सेवा गट- ब उपशिक्षणाधिकारी व तत्सम स्वर्गात पदोन्नतीने सुधारित पदोन्नतीचे आदेश निर्गमित केले आहेत. यामध्ये बीड जिल्हा परिषदेतील शिक्षण विस्तार अधिकारी तथा माध्यमिक विभागाचे प्रभारी उप शिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे यांना नव्याने सांगली जिल्हा परिषदेत माध्यमिक शिक्षण विभागात उपशिक्षणाधिकारी पदावर तर शिक्षण विस्तार अधिकारी ऋषिकेश जनार्दन शेळके यांची पदस्थापना अधीक्षक, वेतन व भत्ते भविष्य निर्वाह निधी (प्रा.) जिल्हा परिषद, परभणी येथे पदस्थापना करण्यात आली आहे. दिनांक २४ एप्रिल २०२६च्या आदेशात बदल करून चार जणांना नव्याने पदस्थापना देण्यात आली आहे. यामध्ये संजय सिदाळकर यांना गटशिक्षणाधिकारी व सदुनी जिल्हा लातूर येथे, तर सुरेश सोनुने पं.स. भोकर ऐवजी गटशिक्षणाधिकारी पं.स. , कळमनुरी, जिल्हा हिंगोली येथे देण्यात आले.



# ११ शिक्षणाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याच्या बदल्या

## जयश्री चव्हाण बीड येथे प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शिक्षण सेवा गट १ मधील शिक्षणाधिकारी तथा तत्सम ११ अधिकाऱ्याच्या बदल्याचे आदेश महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे उपसचिव गो. बा. तशीलदार यांनी सदर आदेश निर्गमित केले आहेत. यामध्ये बीड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी पदी छत्रपती संभाजीनगर येथील शिक्षणाधिकारी (प्रा.) जयश्री एकनाथ चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

बदली करण्यात आलेल्या ११ जणांमध्ये पुढील शिक्षणाधिकारी वर्ग- १ अधिकाऱ्याचा समावेश आहे. भास्कर जगन्नाथ पाटील यांना अहिल्यानगर येथे एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. मोहन पाटील यांना प्राथमिक विभागातून सांगली माध्यमिक विभागात नियुक्ती देण्यात आली. राजेसाहेब लोंढे शिक्षणाधिकारश्री (सांगली) येथून सहाय्यक आयुक्त परीक्षा परिषद, पुणे, सौ. अनुराधा म्हेत्रे शिक्षणाधिकारी (योजना) कोल्हापूर ते शिक्षणाधिकारी (प्रा.) सांगली, प्रदीपकुमार कुडाळकर शिक्षणाधिकारी (योजना) येथून एस.सी.इआर.टी., पुणे, रवींद्र सोनटक्के योजना शिक्षणाधिकारी ते माध्यमिक शिक्षणाधिकारी भंडारा, श्रीम. सुलभा वटारे शिक्षणाधिकारी (योजना) ते शिक्षणाधिकारी मीरा- भाईंदर, किशोर पगारे योजना



शिक्षणाधिकारी ते शिक्षणाधिकारी माध्यमिक यवतमाळ, शेषराव बडे योजना शिक्षणाधिकारी ते योजना शिक्षणाधिकारी भंडारा तर रवींद्र वाणी, सहाय्यक संचालक, छत्रपती संभाजीनगर ते विभागीय सचिन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजी नगर येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

## पान १ वरून...

### बोगस पीक विमाधारकांना

गरजू व पात्र शेतकऱ्यांनाच लाभ मिळावा, यासाठी यंदा विशेष दक्षता घेण्यात येत आहे. कृषी विभाग, महसूल विभाग आणि विमा कंपन्यांमार्फत अर्जांची काटेकोर छाननी, प्रत्यक्ष शेत पडताळणी तसेच तांत्रिक साधनांच्या मदतीने तपासणी केली जाणार आहे. अधिकाऱ्यांच्या मते, यापुढे चुकीची माहिती देऊन, इतरांच्या नावाने किंवा लागवड नसतानाही पीक दाखवून विमा मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कोणतीही दया दाखविली जाणार नाही. शासनाच्या नव्या निर्णयामुळे बोगस पीक विमा प्रकरणांना मोठ्या प्रमाणात आळा बसेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, कृषी विभागाने सर्व शेतकऱ्यांना पीक विमा अर्ज करताना अचूक माहिती, योग्य कागदपत्रे आणि प्रत्यक्ष लागवड केलेल्या पिकाचाच तपशील सादर करण्याचे आवाहन केले आहे. कोणत्याही एजंट किंवा मध्यस्थांच्या भूलथापांना बळी न पडता अधिकृत माध्यमातूनच अर्ज दाखल करावेत, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. यंदाच्या खरीप हंगामात एकीकडे शेतकऱ्यांना पीक विम्याचे संरक्षण उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला असला, तरी दुसरीकडे बोगस लाभार्थ्यांविरोधात झिरो टॉलरन्सची भूमिका स्वीकारण्यात आली आहे. त्यामुळे प्रामाणिक शेतकऱ्यांना न्याय मिळण्यास मदत होणार असून पीक विमा योजनेतील पारदर्शकता आणि विश्वासार्हता अधिक मजबूत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

-------------

### २३ राजकीय पक्षांचे एसआयआर

स्वाक्षरी केली आहे. काँग्रेसचे खासदार आणि पक्षाचे माध्यम प्रभारी सरचिटणीस, जयराम रमेश यांनी सांगितले की, ८ जूनच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार सरन्यायाधीशांना संयुक्त पत्र पाठवण्यात आले आहे. ते म्हणाले, ''८ जून २०२६ रोजी इंडिया आघाडीच्या बैठकीला २१ राजकीय पक्ष आणि एक अपक्ष खासदार उपस्थित होते. त्या बैठकीत निवडणूक आयोगाच्या एसआयआर प्रक्रियेसंदर्भात आणि इतर निवडणूक-संबंधित मुद्द्यांबाबत सरन्यायाधीशांना एक संयुक्त पत्र पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला.'' ते पुढे म्हणाले, ''त्यानुसार, २३ राजकीय पक्ष आणि एका अपक्ष खासदाराने स्वाक्षरी केलेले एक संयुक्त पत्र भारताच्या माननीय सरन्यायाधीशांना पाठवण्यात आले आहे. तृणमूल काँग्रेसचे खासदार डेरेक ओब्रायन यांनीही एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर जयराम रमेश यांच्या वक्तव्याला उत्तर देताना, इंडिया आघाडीबाहेरील पक्ष, आप आणि द्रमुक यांनीही या पत्रावर स्वाक्षरी केल्याची पुष्टी केली. एसआयआर प्रक्रियेला एक वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर सरन्यायाधीशांना हे पत्र पाठवण्यात आले आहे. ही मोहीम गेल्या वर्षी बिहारमध्ये सुरू करण्यात आली होती. त्यानंतर, १३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये तिची अंमलबजावणी करण्यात आली. या प्रक्रियेदरम्यान, ५ कोटींहून अधिक मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत.

--------------

### मुंबईत पावसाचा

पाणी शिरल्याने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. हवामान विभागाने मुंबई, ठाणे, पालघर, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी केला असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. मुंबईत बुधवारी सकाळपासूनच पावसाचा जोर दिसून आला. दादर, माटुंगा, सायन, कुर्ला, घाटकोपर, विक्रोळी, भांडूप आणि मुलुंड परिसरात पावसाची तुफान बॅटिंग झाली. अंधेरी सबवेमध्ये सुमारे अडीच फुटांपर्यंत पाणी साचल्याने हा मार्ग वाहतुकीसाठी अत्यंत धोकादायक बनला. गोरेगावच्या फिल्म सिटी रोड आणि संतोषनगर परिसरातील मुख्य रस्त्यांवर २ ते ३ फुटांपर्यंत पाणी साचल्याने वाहनचालकांची मोठी कोंडी झाली. संध्याकाळच्या सुमारास लाखो चाकरमानी घरी जाण्यासाठी निघाले असतानाच पूर्व द्रुतगती महामार्गावर घाटकोपर, मुलुंड ते ठाणे दरम्यान पावसाचा जोर कमालीचा वाढला. दुपारी पाण्याचा निचरा झाला मात्र संध्याकाळी पुन्हा सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे अडचणी वाढल्या. ठाणे महापालिका क्षेत्रात ८ तासांत तब्बल ८२.७६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. समुद्रात आलेल्या मोठ्या भरतीमुळ मुंब्रा भागात पाणी साचण्यास सुरुवात झाली. सततच्या पावसामुळे मुंब्रा-शीळ मार्ग पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने हा रस्ता वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला असून अनेक वाहने पाण्यात अडकली आहेत. रायगड जिल्ह्यात पावसाची संततधार सुरूच आहे. माणगावजवळील मुगवली फाटा आणि ढालघर फाटा परिसरात मुंबई-गोवा महामार्गावर पाणी आल्याने चालकांना गाडी चालवताना मोठी कसरत करावी लागत आहे. दरम्यान, मुंबई आणि पुण्यात झाडे कोसळण्याच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ झाली आहे. पालघर जिल्ह्यासाठी हवामान खात्याने रेड अलर्ट कायम ठेवल्याने जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड यांनी जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये आणि अंगणवाड्यांना सुट्टी जाहीर केली आहे.

----------

### मयत विलास घुले कुटूबीयांचे

मीडियावर मृत विलास घुले यांच्या कुटुंबियांची बदनामी करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करावी. खासदार बजरंग सोनवणे यांनी टीव्ही चॅनेलवर धमकीवजा भाषा वापरल्याचा आरोप करत, या प्रकरणात त्यांचाही सहभाग तपासावा. कदमवाडी येथील राजश्री कदम या महिलेने युट्यूब आणि टीव्ही चॅनेलवरून बदनामीकारक व खोटे आरोप केल्यामुळे तिच्यावर कारवाई करावी. रमेश घुले यांनी या मागण्यांबाबत बीडच्या पोलीस अधीक्षकांना निवेदन दिले असून, न्याय न मिळाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे. दरम्यान, बुधवारी मृत विलास घुले यांच्या नातेवाईकांनी गावातील पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केले. आरोपिंना अटक होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा संकल्प आंदोलकांनी घेतला होता. मात्र एकूण परिस्थिती बघून प्रशासनाने यशस्वी मध्यस्थी करताना कारवाई करण्याचे आश्वासन दिले आणि आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. त्यानंतर हे आंदोलन थांबविण्यात आले.

--------------

### थलपती विजय यांचे सरकार

सरकारचे माजी मंत्री आणि आमदार सेंथिल बालाजी आणि त्यांचा भाऊ अशोक यांच्याशी जुळले असल्याचा दावा केला जात आहे. टीव्हीके आमदाराच्या तक्रारीवरून कारवाई करत अधिकाऱ्यांनी तपास सुरू केला आणि कन्सल्टन्सी फर्मच्या एका कर्मचाऱ्याला अटक केली. तपासादरम्यान अधिकाऱ्यांना डीएमके आमदार सेंथिल बालाजी यांच्याशी संबंधित धागेदोरे मिळाले. त्यानंतर आणखी दोघांना अटक करण्यात आली असून त्यांची चौकशी सुरू आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्यांपैकी एक जण सेंथिल बालाजी आणि त्यांच्या भावाचा अत्यंत जवळचा आहे. या प्रकरणावर सरकारचे मंत्री सीटी निर्मल कुमार यांनी थेट हल्लाबोल केला आहे. या कटात करूर गँगचे लोक थेट सामील असल्याचा आरोप त्यांनी केला असून डीएमकेवर निशाणा साधला आहे. कुमार म्हणाले, ''सेंथिल बालाजी यांच्याशी थेट संबंधित असलेले आणि तथाकथित करूर गँगचे लोक या प्रकरणात थेट गुंतलेले आहेत. पोलिसांनी कायदेशीर कारवाई करून यात सामील असलेल्या सर्वांना अटक करावी. मंत्री निर्मल कुमार यांनी आरोप केला आहे की, डीएमके नेते एम. के. स्टॅलिन आणि उदयनिधी यांच्या सांगण्यावरून सेंथिल बालाजी आमदारांशी संपर्क साधत आहेत आणि त्यांना १० कोटींपासून ते ५० कोटी रुपयांपर्यंतच्या ऑफर्स दिल्या जात आहेत. डीएमके आणि एआयएडीएमके प्रमुख एडप्पादी के. पलानीस्वामी हे दोघे मिळून विजय यांचे सरकार पाडण्यासाठी मागच्या दाराने प्रयत्न करत असल्याचा दावाही त्यांनी केला. या गंभीर आरोपानंतर डीएमकेने हे सर्व आरोप पूर्णपणे फेटाळून लावले आहेत. डीएमकेचे प्रवक्ते ए. सरवणन म्हणाले की, सरकारकडे कोणताही ठोस पुरावा नाही. जर पुरावे असतील तर सेंथिल बालाजी यांना अटक करून दाखवावी, असे आव्हान त्यांनी विजय सरकारला दिले आहे. दरम्यान, थलपती विजय आणि सेंथिल बालाजी यांच्यातील संबंध आधीपासूनच ताणलेले आहेत. डीएमकेचे माजी मंत्री करूरचे रहिवासी आहेत आणि विजय यांच्या एका निवडणूक रॅलीदरम्यान तिथे चेंगराचेंगरी झाली होती. त्यावेळी विजय यांनी बालाजींवर आपल्याला बदनाम करण्यासाठी चेंगराचेंगरी घडवून आणल्याचा कट रचल्याचा आरोप केला होता, मात्र बालाजी यांनी हा आरोप फेटाळला होता.

-------------

### व्यावसायिक गॅस सिलिंडर

पेट्रोल आणि डिझेलचे किरकोळ दरही जैसे थे आहेत. व्यावसायिक एलपीजी सिलिंडर दरातील कपात सोबतच, तेल विपणन कंपन्यांनी ५ किलोच्या फ्री ट्रेड एलपीजी (एफटीएल) सिलिंडरचा दरही १३ रुपयांनी कमी केला आहे. यामुळे दिल्लीत ५ किलोच्या सिलिंडरची किरकोळ दर आता ८०८.५० रुपये झाला आहे. गेल्या काही महिन्यांतील वाढीनंतर व्यावसायिक एलपीजीच्या दरात कपात केली आहे. याआधी जूनमध्ये घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ केली होती. यमुळे दिल्लीतील १४.२ किलोच्या घरगुती सिलिंडरचा दर ९१३ रुपयांवरून ९४२ रुपयांवर गेला होता. पश्चिम आशियातील संघर्षामुळे जागतिक बाजारात पुरवठा साखळी विस्कळीत झाली. यामुळे ७ मार्च रोजी एलपीजी सिलिंडरच्या दरात ६० रुपयांची वाढ करण्यात आली होती. तर एप्रिलमध्ये व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडर १९५.५० रुपयांनी महाग झाला होता. जानेवारी महिन्यात १९ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलिंडर दरात १११ रुपयांची वाढ केली होती. त्यासोबतच १ जानेवारीपासून ५ किलोचा सिलिंडरही २७ रुपयांनी महाग झाला होता. व्यावसायिक सिलिंडर महाग झाल्याचा फटका हॉटेल, रेस्टॉरंट्सना बसला होता. यामुळे खाद्यपदार्थांच्या दरात वाढ करण्यात आली.

------------

### प्रकाशदादा हे

आला आहे.'' सभापतींच्या या स्पष्टीकरणानंतर प्रकाश सोळंकेंना शांत करण्यात आले आणि त्यांना आपल्या जागेवर बसण्यास सांगण्यात आले. हा व्हिडिओ बुधवारी समाज माध्यमावर चांगलाच व्हायरल झाला. आमदार प्रकाश सोळंके आणि धनंजय मुंडे यांच्यात फारसे जमत नसल्याचे अनरेकवेळा दिसून आले आहे. काही दिवसांपूर्वी मुंडे - बहीण भावांनी माझ्या पराभवाचे षडयंत्र रचले होते, असा आरोप केला होता. या दोघांचे एकमेकात पटत नाही हे निश्चित आहे, परंतु एका निष्पाप मुस्लिम तरुणाचा खून झाला. या हत्येला जबाबदार कोण?. त्याला न्याय मिळाला पाहिजे, अशी आग्रही आणि जनतेची भावना धनंजय मुंडे यांनी सभागृहात मांडली तर बिघडले कुठे. ? मात्र त्याला आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी घेतलेल्या आक्षेपामुळे त्या तरुणाच्या कुटुंबावर एक प्रकारे अन्याय होत आहे. त्या मुस्लिम तरुणाऐवजी दुसऱ्या समाजाचा तरुण असता तर दादा असेच बोलले असते का.? असाही प्रतिसवाल आता जनता आणि समाज माध्यमातून केला जात आहे. दादा हे वागणं बरं नव्हं अशा प्रतिक्रिया मुस्लिम समाजासह जिल्हाभरात उमटू लागल्या आहेत.

-------------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. ०२ जुलै २०२६



# पत्रकारांच्या आंदोलनाला यश ; मग्रूर तलाठी रुपचंद आभारे अखेर शासकीय सेवेतून निलंबित

माजलगाव । प्रतिनिधी

येथील मग्रूर तलाठी रुपचंद सुधाकर आभारे यांच्या विरुद्ध शासकीय पद आणी अधिकाराचा गैरवापर करून स्वताच्या आर्थिक फायद्यासाठी वादातील मिळकत स्वताच्या पत्नी व नातेवाईकांच्या नावे अर्जदाराची फसवणूक केल्याप्रकरणी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी मग्रूर तलाठी रुपचंद आभारेवर दि ०१ जुलै बुधवार रोजी सेवेतून तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे.याप्रकरणी माजलगाव येथील पत्रकारांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील केलेल्या आंदोलन यश आल्याची प्रतिक्रिया पत्रकार वाजेद पठाण, राजरत्न डोंगरे व नईम आतार यांनी दिली आहे

यासंदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी मग्रूर तलाठी रुपचंद आभेरच्या निलंबित आदेशात असे नमूद केले आहे की,ज्याअर्थी,रुपचंद सुधाकर आभारे, ग्राम महसूल अधिकारी, तहसील कार्यालय, माजलगांव यांच्याविरुद्ध शासकीय पद आणि अधिकाराचा गैरवापर करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वादातील मिळकत स्वतःच्या पत्नीच्या नावे करून अर्जदारांची फसवणूक केल्याबाबत गंभीर स्वरूपाची तक्रार दाखल झाली होती.सदर प्रकरणाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, माजलगांव आणि तहसीलदार, माजलगांव यांनी संदर्भीय क्र.२ व ३ अन्वये सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार मौजे माजलगांव येथील गट नं.१०५ मधील क्षेत्राबाबत मा.दिवाणी न्यायालयात स्पेशल दि.दा.क्र. १९/२०२४ प्रलंबित असतांना,तसेच सह-दुय्यम निबंधक कार्यालयात लीज पेन्डन्सी नोंद असतानाही रुपचंद सुधाकर आभारे, ग्राम महसूल अधिकारी यांनी नियमांचे उल्लंघन करून फेरफार मंजूर केले.मौजे माजलगांव येथील संबंधित खरेदीखतांच्या आधारे फेरफार क्र.



१४८४८,१४८२७, १४८२२,१४८२६, १४८४७,१४८४६,२४७४५,१४८२३, १४८३०,१४८२८,१४८२१,१४८२४ हे सर्व दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी नोंदवले व चुकीच्या पद्धतीने फेरफार मंजूर करून शासकीय कर्तव्यात गंभीर कसूर व निष्काळजीपणा केल्याचे सिद्ध झाले आहे.आणि ज्याअर्थी,सदर प्रकरणी रुपचंद सुधाकर आभारे, ग्राम महसूल अधिकारी, तहसील कार्यालय, माजलगांव यांची दि.३० जुन २०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली सदर सुनावणी दरम्यान त्यांनी केलेला युक्तीवाद व सादर केलेला खुलासा मोघम स्वरुपातील, पुरावाहीन व असमाधानकारक असल्याचे अमान्य करण्यात आला आहे.तसेच त्यांचे वर्तन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम ३ मधील तरतूदींचा भंग करणारे असल्याचे आढळून आले आहे.या प्रकरणाच्या गांभीर्याचा विचार करता संबंधित कर्मचाऱ्यास निलंबित करणे आवश्यक व न्यायोचित ठरते.त्याअर्थी रुपचंद सुधाकर आभारे,ग्राम महसूल अधिकारी, तहसील कार्यालय, माजलगांव यांना शासकीय कर्तव्यात गंभीर निष्काळजीपणा, आर्थिक गैरव्यवहार व गैरवर्तन केल्याप्रकरणी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम,१९७९ चे नियम ४ मधील तरतुदींनूसार आदेशाच्या दिनांकापासून म्हणजेच दि ०१ जुलै २०२६ बुधवार रोजी पासुन शासन सेवेतून निलंबित करण्यात येत आहे.

तसेच त्यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम,१९७९ चे नियम ८ अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावीत करण्यात येत आहे.आणखी असेही आदेशीत करण्यात येते की, रुपचंद सुधाकर आभारे,ग्राम महसूल अधिकारी, यांचे निलंबन कालावधीतील मुख्यालय तहसील कार्यालय पाटोदा हे राहील व सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगी शिवाय त्यांना मुख्यालय सोडता येणार नाही.याप्रकरणी पत्रकार वाजेद पठाण, राजरत्न डोंगरे व नईम आत्तार यांनी दि २९ जुन २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केलेल्या आंदोलनाला यश आले असल्याची प्रतिक्रिया दिली आहे.

## थोडक्यात

### 'भुरळ डोळ्यांची' चित्रपटाची दुहेरी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कामगिरी

बीड । प्रतिनिधी

मराठी चित्रपट भुरळ डोळ्यांची ने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आणखी एक मानाचा टप्पा गाठला आहे.




अहमदाबाद (गुजरात) येथे आयोजित 'फिल्म फेम राष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२५' आणि 'गुजराती सिने पुरस्कार २०२६' या राष्ट्रीय स्तरावरील सोहळ्यात अनिलकुमार बाबूराव होळकर यांना 'भुरळ डोळ्यांची' चित्रपटासाठी 'सर्वोत्कृष्ट गीतकार' पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. देशभरातून १२९ चित्रपट, लघुपट, माहितीपट आणि व्हिडिओ अल्बम सहभागी झालेल्या या महोत्सवात विविध भारतीय भाषांतील उत्कृष्ट कलाकृतींचा सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे डोंबिवली (महाराष्ट्र) येथे आयोजित 'स्क्रीन लाईट्स इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल - २०२६' मध्ये चित्रपटाला 'सर्वोत्कृष्ट फीचर फिल्म हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला. त्रेब्री झ्रीळीश एपींर्शीरळपाशपीं प्रस्तुत या महोत्सवात चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक, गीतकार आणि लेखक अनिलकुमार बाबुराव होळकर यांचा सन्मान करण्यात आला.

'भुरळ डोळ्यांची' चित्रपटाला यापूर्वी जवळपास तीस पुरस्कार मिळाले आहेत, तीस पुरस्कार प्राप्त झाले आहेत.चित्रपटाच्या यशात आणखी या दोन राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय सन्मानाची भर पडली आहे. हा गौरव मराठी चित्रपटसृष्टीत मराठी चित्रपटासाठी सन्मान मानला जात आहे.



माजलगाव:- हरितक्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना बाजार समितीचे सभापती जयदत्त (अण्णा) नरवडे,उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे, लेखापाल उद्धव फपाळ,मीनानाथ मुळे,अमोल आगे, अतुल होके, सिद्धेश्वर येवले, महादेव सोनटक्के व गणपत कदम

### चौसाळा येथे पल्स पोलिओ मोहिमेचा उत्साहात शुभारंभ

चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथे रविवारी २८ जुन रोजी ० ते ५ वर्षांखालील बालकांना अंगणवाडी. क्र.४.२ येथे राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम उत्साहात राबविण्यात आले. यावेळी हजारो बालकांना पोलिओचे डोस देऊन सुरक्षा कवच प्रदान करणाऱ्यांत आले यावेळी अंगणवाडी सेविका सुनिता काळे जाकिरा मुजावर . मदतनीस संगिता पारवे व आशा सेविका हुंबे मॅडम यांनी बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस देत पालकांना जनजागृती केली



## वसंतराव नाईक यांच्या आधुनिक कृषी विचाराची आज समाजाला गरज -प्राचार्य डॉ.विश्वास कदम

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात आज महाराष्ट्राची माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरी करण्यात आली यानिमित्ताने महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वृक्षारोपण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती पाटोदा येथील श्री महाजन सर प्रमुख पाहुणे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शक प्राचार्य डॉ विश्वासराव कदम तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सदाशिवराव सरकटे उपस्थित होते.

प्रथम वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून वृक्षारोपण सप्ताहाची उद्घाटन प्राचार्य डॉ विश्वास कदम यांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमात महाजन यांनी आपले मनोगत व्यक्त केले वसंतराव नाईक यांच्या जीवन व कार्याची माहिती दिली तर




प्राचार्य विश्वास कदम यांनी मनोगत व्यक्त करताना समाजाने वसंतराव नाईक यांच्या आधुनिक कृषि ज्ञानाचा अंगीकार करून कृषी क्षेत्राचा विकास करावा असे मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती प्राध्यापक सुनील रावजी जाधव प्राध्यापक सोमनाथ घाडगे डॉ वंदन जाधव कार्यक्रमा अधिकारी प्राध्यापक बापू घोक्षे डॉ रामकृष्ण प्रधान प्राध्यापक प्रवीण शिलेदार डॉ सिद्दिकी प्राध्यापक कल्पना घारगे प्राध्यापक ज्योती राकटे उपस्थित होते या कार्यक्रमाचे संचालन प्राध्यापक डॉ लोखंडे यांनी केले तर आभार प्राध्यापक अशोक देवगुडे यांनी मांडले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरात कृषी दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

## डॉक्टर्स डे व कृषिदिना निमित्त रोटरी क्लब माजलगाव सेंट्रल व इंडियन मेडिकल असोसिएशन तर्फे रक्तदान शिबिर

माजलगाव । प्रतिनिधी

इंडियन मेडिकल असोसिएशन माजलगाव व रोटरी क्लब माजलगाव सेंट्रल यांचे संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय डॉक्टर्स डे व महाराष्ट्र कृषी दिनाच्या निमित्ताने दि ०१ जुलै बुधवार रोजी डॉ. राजेभोसले यांचे यशवंत हॉस्पिटल माजलगाव येथे रक्तदान शिबीर आयोजित केले होते.यामध्ये शहरातील अनेक डाक्टर्स रोटेरियन सह ३० युवकांनी उस्फुर्त प्रतिसाद देत या प्रसंगी रक्तदान केले.



राष्ट्रीय डॉक्टर्स डे व कृषी क्रांतीचे जनक स्व.माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती तसेच महाराष्ट्र कृषी दिनाचे औचित्य साधून दि ०१ जुलै बुधवार रोजी इंडियन मेडिकल असोशियशन माजलगाव व रोटरी क्लब माजलगाव सेंट्रल यांचे संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर आयोजित केले होते,या रक्तदान शिबीरामध्ये शहरातील नामांकित डॉक्टरांनी स्वयंस्फूर्त रक्तदान केले यात हृदय रोग तज्ज्ञ डॉ.राधाकिशन डाके,डॉ.यशवंत राजेभोसले, डॉ.राजेश रुद्रवार, डॉ.बोरगावकर,डॉ. प्रतीक भांगरे,डॉ. शेख यांच्यासह रोटरी माजलगाव सेंट्रलचे सचिव रो.अंकुश राठोड, सुनील भालेराव सह अनेक युवकांनी रक्तदान करण्यात सहभाग नोंदवला.यावेळी आय.एम.ए. माजलगाव चे अध्यक्ष डॉ. शामसुंदर काकानी, सचिव डॉ.राजेश रुद्रवार,विश्वस्त डॉ. शिवाजीराव काकडे, डॉ.परमेश्वर राठोड, डॉ.बिभीषण सोनवणे, डॉ.सुनील गरड, डॉ.प्रवीण वारकरी, सह रोटरी क्लबचे नूतन अध्यक्ष रो.प्रभाकर शेटे, रो.आण्णासाहेब तौर, रो.प्रा.निळकंठ साबळे, रो.पांडुरंग चांडक, रो.सुनिल शिंदे इत्यादी उपस्थित होते.

## रामनगर तंडा येथे वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील छोटेवाडी, रामनगर तंडा येथे वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पुजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. जयंतीचे औचित्य साधुन रामनगर तंडा येथील मुख्य रस्ता व शाळेच्या आवारात आंबा, चिंच, जांभळ, पारिजातक, पेरू, कडुलिंब,अशोका,वड या झांडाचे वृक्षारोपण करण्यात आले. झाडांच्या संगोपनाचा संकल्प ही सर्व ग्रामस्थांनी यावेळी केला. याप्रसंगी सरपंच अंगदराव कटके, उपसरपंच बाळासाहेब चव्हाण ,ग्रामविकास अधिकारी डि. के. ताटे, ग्रामपंचायत सदस्य श्रीमंत राठोड ,ग्रामपंचायत सदस्य



जगन्नाथ राठोड, भगवानराव राठोड, रेविनाथ चव्हाण, राजाभाऊ राठोड ,दिलीप राठोड,भानदास राठोड ,दिगंबर राठोड ,भीमराव राठोड, प्रकाश राठोड, राजेभाऊ राठोड, व्यंकटी राठोड ,अरुण राठोड ,लक्ष्मण राठोड, वसंत राठोड, विष्णू चव्हाण ,जयपाल राठोड, लहू चव्हाण ,अनिल राठोड ,आत्माराम राठोड, उत्तम राठोड ,सुनील राठोड, अनिल चव्हाण ,रोशन राठोड,पंडीत राठोड यांची उपस्थिती होती.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सतीश राठोड, बंडू राठोड, कृष्णा चव्हाण, दिलीप राठोड, रंजीत राठोड ,अनिल राठोड यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### कला ही जीवन समृद्ध करते

पैसा देतील. पण, तुमच्या अंगातील कला तुम्हाला जगण्याची नवी ऊर्जा, नवा अर्थ देईल. कला ही जीवन समृद्ध करीत असते. कोल्हापूर मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.ए.बी.पाटील यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले, या विश्वविक्रमी कार्यक्रमामुळे कोल्हापूर मधील कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळाले आणि कोल्हापूरचे नाव कलेच्या माध्यमातून जगाच्या नकाशावर पोहोचले. कार्यक्रमाच्या मुख्य आयोजिका डॉ.आशा शितोळे म्हणाल्या, आर. डी.बर्मन यांच्या जयंतीनिमित्त हा कार्यक्रम आयोजित केला होता.आम्ही यापूर्वीही अशा प्रकारचे चार कार्यक्रम घेतले. संपूर्ण महाराष्ट्रातून गायक कलाकारांनी भरभरून प्रतिसाद दिला, त्यांचे मनापासून आभार.

सोहळ्याच्या शेवटी १०० गाणी सलग सादर करणाऱ्या सर्व गायक कलाकारांचा डॉ.राजेश इंगोले, डॉ.प्रज्ञा किनगावकर, डॉ.आशा जाधव, डॉ.स्मिता परितेकर, डॉ.आशा शितोळे व डॉ.के.टी.शिंदे यांच्या हस्ते विश्वविक्रमी मेडल, सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी आंतरराष्ट्रीय कराटेपटू शिवाय शितोळे व स्टार प्रवाहची बालकलाकार शुभ्रा खाडे, मृण्मय खाडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चित्रा कवाळे व डॉ.माया मनपाडळेकर यांनी केले, तर गाण्यांची क्रमबद्ध मांडणी पुष्पक गवई यांनी केली. तर उपस्थितांचे आभार डॉ.स्मिता परितेकर यांनी मानले. कार्यक्रमासाठी छायाचित्र संकलन अजित कुरणे तर साऊंड व्यवस्था रमेश सुतार यांनी पाहिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.आशा शितोळे, डॉ.अनिल कवठेकर, राजकुमार पारकर, डॉ.स्मिता परितेकर, डॉ.स्मिता राणी मोरे, डॉ.राजेंद्र वायचळ व डॉ.के.टी.शिंदे यांनी पुढाकार घेतला.

### लोकनेते विनायकराव मेटे

खरेदी-विक्री संघाचे संचालक गोपीनाथ घुमरे, मनोज जाधव, गणेश मोरे, हरीश शिंदे, विष्णू कळसुले, मंगेश माने, राजेंद्र माने आदी मान्यवरांनी सहभाग नोंदविला. लोकनेते विनायकराव मेटे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या वृक्षारोपण उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. उपस्थितांनी वृक्षसंवर्धनाचा संकल्प करत लोकनेते विनायकराव मेटे यांच्या सामाजिक कार्याला अभिवादन केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पंडितराव माने यांनी केली .

### धर्मदाय कार्यालयातील

कमी होईल. तसेच माहिती अधिकाराच्या अर्जांची पूर्तता, न्यायालयीन कामकाज आणि प्रशासकीय निर्णयप्रक्रिया अधिक प्रभावी होण्यास मदत मिळणार आहे. शासनाच्या डिजिटल प्रशासनाच्या संकल्पनेला बळ देणारा हा उपक्रम धर्मदाय विभागाच्या कार्यपद्धतीत सकारात्मक बदल घडवून आणणारा ठरणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. कांचन गंगा जाधव (सुपाते) यांनी पदभार स्वीकारताच घेतलेल्या या निर्णयामुळे धर्मदाय उप आयुक्त कार्यालय अधिक आधुनिक, पारदर्शक आणि कार्यक्षम होण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

### लावलेली रोपे जगविणे ही

अशोक जोगदंड,सुरेश लाखे, गाडे पाटील, बंडू आप्पा घोलप यांची उपस्थिती होती. लोकलढा पाणी आंदोलनाचे पाचेगाव येथील समन्वयक संजय जाधव हे वाढदिवसाचे औचित्य साधून दरवर्षी वृक्षारोपण करतात. यावेळी करंज, बेल, लिंब, चिंच आदींची रोपे लावण्यात आली. यावेळी राजाभाऊ कुटे महाराज म्हणाले, की अनेक ठिकाणी उत्साहात वृक्षारोपण केले जाते, मात्र वृक्षारोपणानंतर त्याकडे कोणी फिरकत नाही, त्यामुळे बहुतांश रोपांचे संगोपण होत नाही. संजय जाधव मात्र वर्षभर रोपांचे संगोपन करतात, हे कौतुकास्पद असल्याचेही ते म्हणाले. यावेळी पाचेगावसह परिसरातील शेतकरी, लोकलढा पाणी आंदोलनचे समन्वयक उपस्थित होते.

### टाटा मेमोरियल मार्फत 'गुरूकृपा'मध्ये

सहभागी होणार असून तशा सुचना तीनही जिल्ह्याच्या जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकार्यांनी निर्गमित केले आहेत. विशेष म्हणजे या कार्यशाळेला महाराष्ट्र मेडिकल कॉन्सीलच्या वतीने सीएमईचे गुणांकन देखील मंजूर करण्यात आलेले आहे. माजलगाव सारख्या ठिकाणी टाटा मेमोरियल या अंतरराष्ट्रीय किर्तीच्या संस्थेची कार्यशाळा प्रथमच होत असून तो मान 'गुरूकृपा' समुहाला मिळाला आहे. या कार्यशाळेला उपस्थितीत राहण्याचे आवाहन टाटा मेमोरियलचे संचालक डॉ.राजेश दिक्षीत व गुरूकृपाचे डॉ.यशवंत राजेभोसले यांनी केले आहे.

### वसंतराव नाईक यांचे

शिवाजी शिंदे, अण्णासाहेब जगताप, मंडळ कृषी अधिकारी जे. एल. खेडकर, कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) मुनगिलवार, कृषी विस्तार अधिकारी डी. एल. गडपाळे यांच्यासह पंचायत समिती व कृषी विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.यावेळी मागील वर्षीच्या पीक स्पर्धेतील विजेत्या शेतकऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक गोपीनाथ पवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन मंडळ कृषी अधिकारी दत्तप्रसाद भोसले (गंगामसला) यांनी केले.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-६६१ दिनांक-१९/०६/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती सुंदर नानाराव जायभाये रा.दुनगाव ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या मुलगी च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र. नाव अर्जदाराशी नाते जन्म दिनांक
अभिनव सुंदर जायभाये मुलगा ११/०९/२००९

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-२०/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-६५३ दिनांक-१९/०६/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती कृष्णा सिताराम बनगे रा.झोडेगाव ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या आई च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र. नाव अर्जदाराशी नाते जन्म दिनांक
कौसाबाई सिताबाई बनगे आई १५/०५/२०००

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-०९/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-७४९ दिनांक-०१/०७/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती रवि भीमराव डोईफोडे रा.भार्डी ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या स्वतः च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र. नाव अर्जदाराशी नाते जन्म दिनांक
रवि भीमराव डोईफोडे स्वत: २०/०६/१९९२

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-०१/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.


स्वाक्षरित/-
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

# सुपर एल निनोचा धोका वाढला; ऑस्ट्रेलियाच्या हवामान विभागाचा इशारा

दिल्ली / प्रतिनिधी

जगभरातील हवामान व्यवस्थेला मोठा धक्का देऊ शकणारा सुपर एल निनो वेगाने आकार घेत असल्याचा इशारा ऑस्ट्रेलियाच्या हवामान विभागाने दिला आहे. प्रशांत महासागरातील समुद्रपृष्ठाचे तापमान एल निनोच्या मर्यादेपेक्षा झपाट्याने वाढत असून, वातावरणीय परिस्थितीही या प्रक्रियेला अधिक बळ देत आहे. त्यामुळे भारतात मॉन्सून हंगामातील पावसावर परिणाम होण्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

हवामान तज्ज्ञांच्या मते, ही स्थिती कायम राहिल्यास १९५० नंतरच्या सर्वात शक्तिशाली एल निनो घटनांपैकी एक यंदा अनुभवायला मिळू शकते. त्यामुळे भारतासह जगभरात दुष्काळ, अतिवृष्टी, पूर, उष्णतेच्या लाटा आणि शेती उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ऑस्ट्रेलियाच्या हवामान विभागाच्या सदर्न हेमिस्फिअर मॉनिटरिंग रिपोर्टनुसार, एल निनो आता अधिकृतपणे सक्रिय झाला आहे. मध्य प्रशांत महासागरातील समुद्राचे तापमान एल निनोच्या आवश्यक मर्यादेपेक्षा अधिक झाले असून, महासागर आणि वातावरण यांच्यातील परस्परसंवाद अधिक मजबूत होत आहे. हा परस्परसंवाद एल निनोची तीव्रता आणखी वाढवतो. त्यामुळे यंदाच्या वर्षअखेरीपर्यंत एल निनो कायम राहण्याची शक्यता हवामान मॉडेल्सनी व्यक्त केली आहे. ऑस्ट्रेलिया हवामान विभागाच्या माहितीनुसार, २८ जून २०२६ रोजी संपलेल्या आठवड्यात निनो ३.४ निर्देशांक




+१.२४ अंश सेल्सिअस इतका नोंदवण्यात आला आहे. एल निनो जाहीर करण्यासाठी आवश्यक मर्यादा +०.८० अंश सेल्सिअस असते. विशेष म्हणजे, केवळ गेल्या दोन आठवड्यांत या निर्देशांकात ०.३ अंश सेल्सिअसची वाढ झाली आहे. जगभरातील सर्व प्रमुख हवामान मॉडेल्स पुढील काही महिन्यांत प्रशांत महासागराचे तापमान आणखी वाढेल, असा अंदाज व्यक्त करत आहेत. समुद्राच्या तापमानाबरोबरच वातावरणीय स्थितीही एल निनोच्या विकासाला अनुकूल बनली आहे. प्रशांत महासागरावरील व्यापारी वारे नेहमीपेक्षा कमकुवत झाले असून, काही भागांत ते उलट दिशेने वाहत आहेत. याशिवाय, डेट लाईनजवळ ढगांचे प्रमाण वाढले आहे. सदर्न ऑसिलेशन इंडेक्स हा २७ जून रोजी -२५.२ इतका नोंदवला गेला आहे. भारताच्या मॉन्सूनवर प्रभाव टाकणारा आणखी एक महत्त्वाचा हवामान घटक म्हणजे इंडियन ओशन डायपोल म्हणजेच आयओडी सध्या तटस्थ अवस्थेत आहे. २७ जून रोजी आयओडी निर्देशांक -०.०२ अंश सेल्सिअस नोंदवला गेला.

**शेतीवर मोठा परिणाम होण्याची भीती :** सुपर एल निनोचा सर्वाधिक फटका शेती क्षेत्राला बसू शकतो. भारतात विशेषतः पावसावर अवलंबून असलेल्या धान, मका, सोयाबीन, कापूस, डाळी आणि ऊस यांसारख्या पिकांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. पावसात खंड पडल्यास पेरण्या उशिरा होणे, पिकांची वाढ खुंटणे, उत्पादन घटणे आणि शेती खर्च वाढणे अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. यापूर्वीच्या २०१५-१६ आणि २०२३-२४ च्या एल निनो काळात जगातील अनेक देशांमध्ये दुष्काळ, पीकनुकसान, जनावरांचे नुकसान, अन्नधान्याच्या किमतीत वाढ आणि अन्नसुरक्षेचे गंभीर प्रश्न निर्माण झाले होते. २०१५-१६ च्या एल निनोमुळे जगभरातील ६ कोटींहून अधिक लोक प्रभावित झाले होते. दरम्यान, भारतीय मान्सूनच्या दृष्टीने पुढील काही आठवडे अत्यंत निर्णायक ठरणार आहेत. एकीकडे प्रशांत महासागरातील एल निनो वेगाने बळकट होत आहे, तर दुसरीकडे हिंद महासागरातील आयओडी सकारात्मक होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या दोन्ही हवामान प्रणालींच्या परस्पर परिणामावर यंदाच्या मॉन्सूनचे स्वरूप मोठ्या प्रमाणात अवलंबून असेल.

मात्र ऑस्ट्रेलियाच्या हवामान मॉडेल्सनुसार, दक्षिण गोलार्धातील हिवाळा आणि वसंत ऋतूत सकारात्मक आयओडी विकसित होण्याची शक्यता आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, सकारात्मक आयओडी भारतासाठी काही प्रमाणात दिलासादायक ठरू शकतो. कारण अशा स्थितीत हिंद महासागरातून भारताकडे अधिक आर्द्रता येते आणि अनेकदा एल निनोमुळे होणाऱ्या पावसाच्या तुटीची तीव्रता कमी होऊ शकते. मात्र सकारात्मक आयओडी नेमका कधी तयार होईल आणि तो किती प्रभावी ठरेल, याबाबत अद्याप निश्चितता नाही. गेल्या तीन वर्षांपासून ध्रुवीय प्रदेश वगळता जगातील महासागरांचे तापमान दीर्घकालीन सरासरीपेक्षा ०.३५ ते ०.७३ अंश सेल्सिअस अधिक राहिले आहे. यंदा जून महिन्यात ही तफावत आणखी वाढली असून, वर्षातील या कालावधीसाठी तो नवा विक्रम ठरला आहे.

## माळवी जातीची देशी गाय; सर्वात जास्त दूध देणाऱ्या जातींपैकी एक!



माळवी ही भारतातील सर्वाधिक दूध देणाऱ्या गायींच्या जातींपैकी एक आहे. या गायीचे मूळ मध्य प्रदेशातील माळवा पठारी प्रदेशातील असल्याचे मानले जाते. या गायीला महादेवपुरी आणि मंथनी या नावांनीही ओळखले जाते. दिसायला ही गाय इतर गायींपेक्षा सुंदर, मोठी आणि सुडौल आहे. ही जात वेगवेगळ्या जातींमध्ये विकसित झाली आहे जसे की हलकी, मध्यम आणि आकाराने जड, मातीच्या परिस्थितीनुसार ती पैदास केली जाते. तसेच, ती अनेक प्रकारे कांकरेज जातीशी साम्य दर्शवते. ही गायी कमी परंतु अतिशय दर्जेदार दूध देते.

माळवी गाय किती दूध देते? : माळवी जातीची गाय दररोज १२ ते १५ लिटर दूध देते. जे इतर गायींच्या तुलनेत दीडपट आहे. एवढेच नाही तर माळवी गाईच्या दुधात फॅटचे प्रमाणही इतर गायींच्या तुलनेत जास्त आढळते. माळवी गाईच्या दुधात ४.५ टक्क्यांहून अधिक फॅट आढळते. या जातीची गाय २० ते ५० हजार रुपयांना मिळते.

माळवी गाय कुठे आढळते? : पश्चिम मध्य प्रदेशातील माळवा पठार व्यतिरिक्त इंदूर, उज्जैन, रतलाम, देवास, शाजापूर इत्यादी जिल्ह्यांत या गायी आढळतात. हैदराबादमध्येही त्याचे संगोपन केले जाते. वक्र रचनेमुळे मालवी जातीच्या बैलांचाही भार वाहून नेण्यासाठी आणि शेतीसाठी वापर केला जातो. ही जात कांकरेज गायीच्या जातीशी मिळतेजुळते आहे.

माळवी जातीच्या गायीची वैशिष्ट्ये : या गायी साधारणपणे पांढऱ्या, तपकिरी किंवा पांढऱ्या-तपकिरी रंगाच्या असतात. मान, खांदे, कुबड्याचा रंग तपकिरी-काळा असतो. डोळ्यांभोवतीचे केस काळे असतात. लहान डोके, रुंद थूथन जे किंचित वरचे आहे. पाय लहान पण मजबूत आहेत. त्यांचे खुर काळे आणि मजबूत असतात. शिंगे मोठी असतात आणि बाहेरच्या बाजूने बाहेर येतात. लहान कान, मध्यम शेपटी, सरळ पाठ ही देखील या जातीची वैशिष्ट्ये आहेत. माळवी गाईचे सरासरी वजन ३५० किलो पर्यंत असते. ही गुरे खडबडीत रस्त्यांवर जास्त ओझे वाहून नेण्यास सक्षम आहेत.

## कोकम पिकाचे लागवड तंत्रज्ञान

कोकणामध्ये विविध प्रकारची फळझाडे आढळतात. आंबा, काजू, नारळ, सुपारी झाडांच्या कोकणात मोठ्या प्रमाणात बागा आहेत. त्यामध्ये कोकम हे प्रामुख्याने आढळणारे सदाहरित फळझाड आहे. या फळपिकाची शास्त्रोक्त पद्धतीने लागवड कशी करायची. याबाबत आज आपण सविस्तरपणे जाणून घेणार आहोत. कोकम लागवडीसाठी पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन उपयुक्त आहे. या झाडाच्या चांगल्या वाढीसाठी उष्ण व दमट हवामान योग्य असते.

‘या’ आहेत सुधारित जाती : कोकमामध्ये रोपापासून लागवड केल्यास ५० टक्के नर व ५० टक्के मादी झाडे निघतात. खात्रीशीर मादी झाडे मिळविण्यासाठी कलम पद्धतीचा वापर करणे आवश्यक आहे. त्यासाठी विद्यापीठाने मृदकाष्ठ पद्धत विकसित केली आहे. लागवडीत ९० टक्के मादी व १० टक्के नरांची झाडे ठेवावीत. कोकण अमृता व कोकण हातीस या विद्यापीठाने सुधारित जाती विकसित केल्या आहेत. यात कोकण अमृता या जातीची फळे मध्यम आकाराची, जाड सालीची आणि आकर्षक लाल रंगाची असून, उत्पन्न भरपूर (१४० किलो/झाड) देणारी आहेत. पावसाळ्यापूर्वी उत्पन्न मिळत असल्यामुळे फळांचे नुकसान होत नाही. तर कोकण हातीस ही विद्यापीठाने २००६ मध्ये विकसित केलेली मादी जात आहे. या जातीची फळे मोठी, जाड सालीची व गर्द लाल रंगाची आहेत. प्रति झाडापासून १० व्या वर्षी १५० किलो फळे मिळतात. हे मादी झाड असल्यामुळे परागीकरण



व फलधारणेसाठी कोकणाचे ‘नर’ कलम किंवा ५ ते ६ टक्के रोपे बागेत लावणे गरजेचे आहे.

कशी करावी लागवड? कोकम लागवडीसाठी मे महिन्यात सहा बाय सहा मीटर अंतरावर ६० बाय ६० बाय ६० सेंटिमीटर आकाराचे खड्डे काढावेत. पावसाळ्यापूर्वी चांगली माती, एक घमेले कुजलेले शेणखत व १.० किलो सिंगल सुपर फॉस्फेट यांच्या मिश्रणाने भरून घ्यावेत. रोपांचे किंवा कलमांचे वाळवीपासून संरक्षण करण्यासाठी ५० ग्रॅम फॉलीडॉल पावडर प्रत्येक खड्ड्यात टाकावे. पावसाच्या सुरुवातीला प्रत्येक खड्ड्यात एक वर्षाची निरोगी, जोमदार वाढणारी दोन रोपे किंवा एक कलम लावावे. रोपांपासून लागवड केलेल्या बागांना ६ वर्षांनी मोहर येऊन मादी झाडापासून उत्पन्न मिळू लागते.

कधी कराल काढणी? रोपांची लागवड केलेल्या झाडाला सहा वर्षांनंतर फळे धरू लागतात. तर कलमांपासून पाचव्या वर्षांपासून फळे घ्यावीत. ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यांत फुले येण्यास सुरुवात होते. मार्च ते जून महिन्यांपर्यंत फळे काढणीसाठी तयार होतात. हिरव्या रंगाची कच्ची फळे पिकल्यानंतर लाल होतात. पूर्ण लाल झाल्यानंतर फळे काढावीत. चांगल्या वाढलेल्या व योग्य वीण राखलेल्या झाडांपासून प्रत्येक वर्षी १०० ते १५० किलोपर्यंत फळे मिळतात.

## मका लागवडीसाठी निवडा वाण; मिळेल हेक्टरी विक्रमी उत्पादन !

राज्यातील जवळपास सर्वच जिल्ह्यांमध्ये कमी अधिक प्रमाणात मका पिकाची लागवड केली जाते. मात्र, मका पिकातून चांगले विक्रमी उत्पादन मिळवायचे असेल तर मकाच्या सुधारित वाणांची लागवड करणे गरजेचे आहे. अशातच हवामान विभागाने देखील यंदा राज्यात वरुणराजा चांगला बरसणार असल्याचे भाकीत केले आहे. ज्यामुळे सध्या शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, अनेकजण शेतीच्या बियाण्यांची चौकशी करताना आढळून येत आहे. याच पार्श्वभूमीवर मका पिकाच्या सुधारित जातींची माहिती जाणून घेतल्यास चांगला फायदा होतो.

‘या’ आहे मकाच्या सुधारित जाती :

पुसा संकरित मका १ - पावसाळी हंगामात ‘पुसा संकरित मका १’ या जातीच्या मकाची लागवड केल्यास शेतकऱ्यांना चांगले उत्पादन मिळते. मकाचे हे वाण लवकर हार्वेस्टिंगसाठी तयार होते. प्रामुख्याने ७० ते ८० दिवसात हे वाण काढणीला येते. या वाणापासून हेक्टरी ४० ते ५० क्विंटल मका उत्पादन मिळते. विवेक संकरित मका २१ - ‘विवेक संकरित मका २१’ या जातीची देखील पावसाळ्यात लागवड केली जाऊ



शकते. ७० ते ८० दिवसात या जातीचे पीक परिपक्व होते. तसेच या जातीपासून ४५ ते ५० क्विंटल प्रति हेक्टर इतके उत्पादन मिळते. विवेक संकरित मका २७ - ‘विवेक संकरित मका २७’ हे देखील मकाचे लवकर हार्वेस्टिंगसाठी तयार होणारे वाण आहे. या जातीचे पीक ८० ते ९० दिवसात हार्वेस्टिंगसाठी तयार होते. तसेच त्यापासून हेक्टरी ५० ते ५५ क्विंटलपर्यंतचे उत्पादन मिळते. महाराजा - महाराजा या जातीची मका देखील लवकर हार्वेस्टिंगसाठी तयार होते. या जातीचे पीक सरासरी ८० ते ९० दिवसात हार्वेस्टिंगसाठी तयार होते. तसेच त्यापासून हेक्टरी ६० ते ६५ क्विंटल इतके दर्जेदार उत्पादन मिळते. राजर्षी - मकाचे हे मध्यम कालावधीत हार्वेस्टिंगसाठी तयार होणारे वाण आहे. या जातीचे पीक सरासरी ९० ते १०० दिवसात परिपक्व होते. तसेच या जातीपासून हेक्टरी ७० ते ७५ क्विंटल इतके दर्जेदार उत्पादन मिळते. फुले महर्षी - फुले महर्षी या जातीचे मका पीक ९० ते १०० दिवसात काढण्यासाठी तयार होते. तसेच या वाणाच्या मदतीने एका हेक्टरमध्ये ७५ ते ८० क्विंटल पर्यंत मका उत्पादन मिळते. बायो-९६३७ - मकाची ही देखील जात मध्यम कालावधीत हार्वेस्टिंगसाठी तयार होणारी जात आहे. या जातीपासून शेतकऱ्यांना हेक्टरी ७० ते ७५ क्विंटल इतके उत्पादन मिळते. या वाणाचा पीक परीपक्व कालावधी हा ९० ते १०० दिवसांचा असून, महाराष्ट्रात लागवडीसाठी हे वाण अत्यंत उपयुक्त आहे.फ




### महत्वाच्या घटना

१६९८ : थॉमस सावेरी यांनी पहिले स्टीम इंजिन चे पेटंट मिळवले.
१८५० : बेंजामिन लेन या शास्त्रज्ञाला 'गॅस मास्क'चे अनेरिकन पेटंट बहाल
१८६२ : कलकत्ता येथील उच्च न्यायालयाची स्थापना उच्च न्यायालयीन कायदा १८६१ अंतर्गत करण्यात आली.
१८६५ : 'साल्व्हेशन आर्मी' या सेवाभावी संस्थेची स्थापना
१९४० : सुभाषचंद्र बोस यांना कलकत्ता येथे स्थानबद्ध करण्यात आले.
१९६२ : रॉजर्स, आरकॅन्सास येथे पहिले 'वॉल मार्ट' स्टोअर उघडले.
१९७२ : भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी आणि पाकिस्तानचे पंतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो यांनी सिमला करारावर स्वाक्षर्या केल्या.
१९८३ : कल्पक्कम, तामिळनाडू येथील अणूऊर्जा केंद्र सुरू झाले.
१९९४ : चित्रकार जगदीश स्वामीनाथन यांची मध्यप्रदेश सरकारच्या कालिदास सन्मानासाठी निवड
२००१ : बिहारमधील चंपारण्य जिल्हयातील केसरिया गाव येथे ०४ फूट उंचीचा जगातील सर्वात मोठा बौध्द स्तूप सापडला.
२००२ : स्टीव फॉसेट हा उष्ण हवेच्या फुग्याद्वारे पृथ्वी प्रदक्षिणा करणारा सर्वप्रथम व्यक्ती झाला.
२००४ : युनेस्कोच्या जागतिक वारसा समितीने मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्टेशनला जागतिक वारसा स्थळाच्या यादीत समाविष्ट केलं.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६२ : नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ विल्यम हेन्री ब्रॅग यांचा जन्म.
१८७७ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन लेखक हेर्मान हेस यांचा जन्म.
१८८० : गणेश गोविंद तथा 'गणपतराव' बोडस नट व गायक, 'गंधर्व नाटक मंडळी'चे एक संस्थापक (मृत्यू: २३ डिसेंबर १९६५)
१८९३ : स्वतंत्र भारतातील पंजाब राज्याचे पहिले राज्यपाल व आंध्रप्रदेश राज्याच्या स्थापने नंतरचे आंध्रप्रदेश राज्याचे पहिले राज्यपाल चंदूलाल माधवलाल त्रिवेदी यांचा जन्मदिन.
१९०४ : रेने लॅकॉस्त फ्रेन्च लॉन टेनिस खेळाडू आणि 'पोलो' टी शर्टचे जनक (मृत्यू: १२ आक्टोबर १९९६)
१९०६ : नोबल पुरस्कार विजेते अमेरिकन भौतिकीतज्ञ बेटे हान्स आल्ब्रेख्ट यांचा जन्म.
१९२२ : पिअर कार्डिन फ्रेन्च फॅशन डिझायनर
१९२३ : जवाहरलाल अमोलकचंद दर्डा स्वातंत्र्यसैनिक व राजकारणी (मृत्यू:)
१९२५ : पॅट्रिक लुमूंबा काँगोचे पहिले पंतप्रधान (मृत्यू: १७ जानेवारी १९६१)
१९२६ : विनोदी लेखक वि. आ. तथा विनायक आदिनाथ बुवा यांचा जन्म.
१९३० : कार्लोस मेनेम अर्जेंटिनाचे ५० वे राष्ट्राध्यक्ष
१९४६ : प्रसिद्ध भारतीय लेखक, पत्रकार व साहसी कादंबरीकार अरुपकुमार दत्त यांचा जन्मदिन.
१९५४ : प्रसिद्ध भारतीय चित्रपट पार्श्वगायक मुहम्मद अझीज यांचा जन्मदिन.
१९६० : हिंदुस्थानी शास्त्रीय परंपरेतील प्रसिद्ध लखनऊ तबला घराण्याची शाखा असलेल्या जोशी जोशी घराण्याचे सदस्य भारतीय गायक पंडित संतोष जोशी यांचा जन्मदिन.
१९८३ : भारतीय व्यावसायिक पॅरा-बॅडमिंटनपटू व उत्तरप्रदेश राज्यातील गौतमबुद्ध नगरचे जिल्हा दंडाधिकारी सुहास ललीनाकेरे यथिराज यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५६६ : नोट्रे डॅम प्रसिद्ध फ्रेंच ज्योतिषी, गणितज्ञ व भविष्यवेत्ता (जन्म: १४ डिसेंबर १५०३)
१७७८ : रुसो फ्रेन्च विचारवंत, लेखक व संगीतकार (जन्म: २८ जून १७१२)
१८४३ : डॉ. सॅम्यूअल हानेमान होमिओपाथी या वैद्यकीय उपचारपद्धतीचे जनक (जन्म: १० एप्रिल १७५५)
१९५० : युसूफ मेहेर अली समाजवादी नेते, स्वातंत्र्यसैनिक व मुंबईचे महापौर (जन्म: २३ सप्टेंबर १९०३)
१९६१ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन लेखक अर्नेस्ट हेमिंग्वे यांनी आत्महत्या केली (जन्म: २१ जुलै १८९९)
१९९९ : मारिओ पुझो अमेरिकन लेखक (जन्म: १५ आक्टोबर १९२०)
२००७ : दिलीप सरदेसाई क्रिकेटपटू (जन्म: ८ ऑगस्ट १९४०)
२०११ : चतुरानन मिश्रा केंद्रीय कृषी मंत्री, कामगार नेते, कम्युनिस्ट पक्षाचे नेते (जन्म: ७ एप्रिल १९२५)
२०१३ : कॉम्पुटर माउस चे शोधक डगलस एंगलबर्ट यांचे निधन. (जन्म: ३० जानेवारी १९२५)

# पतसंस्थांच्या वसुलीसाठी कायदेशीर तरतुदींचा प्रभावी वापर करा : दिलीप तिजोरे

जामखेड। प्रतिनिधी

पतसंस्थांच्या थकीत कर्जवसुलीसाठी केवळ पाठपुरावा करून चालणार नाही, तर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम १०१, ९१ आणि निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्ट १८८१चे कलम नुसार १३८ या कायदेशीर तरतुदींचा प्रभावी व वेळेवर वापर करणे आवश्यक आहे. या तरतुदींची अंमलबजावणी केल्यास कर्जवसुली अधिक परिणामकारक होऊन संस्थांची आर्थिक शिस्त व स्थैर्य कायम राहण्यास मदत होते, असे प्रतिपादन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जामखेडचे दिलीप तिजोरे यांनी केले. राज्यभर सुरू असलेल्या सहकार सप्ताहानिमित्त रायसिना इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल, जामखेड येथे तालुक्यातील नागरी, ग्रामीण व सेवक सहकारी पतसंस्थांसाठी आयोजित विशेष परिसंवादात ते बोलत होते. या परिसंवादाला विविध पतसंस्थांचे चेअरमन भानुदास बोराटे, राजेंद्र कोठारी, ज्ञानेश्वर अंदुरे, गुलाब जांभळे, बळीराम मेहेर, ॲड अल्ताप शेख, सुनील हजारे, किरण अंधारे, दीपक देवमाने , ॲड सचिन आटकरे, तसेच कार्यालयाचे सहकार अधिकारी अनिकेत पवार, विशाल वणवे,




तसेच चेअरमन, संचालक, सचिव, व्यवस्थापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

परिसंवादात पतसंस्थांच्या थकीत कर्जवसुलीतील अडचणी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील विविध कायदेशीर तरतुदी, सहकार कायद्यातील बदल, उपविधी, संस्थांच्या प्रशासनातील बदलते नियम, लेखापरीक्षण अहवालातील महत्त्वपूर्ण बाबी तसेच दैनंदिन कामकाजाशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी दिलीप तिजोरे म्हणाले, ''प्रत्येक पतसंस्थेने थकीत कर्जवसुलीबाबत विलंब न करता कायद्यातील उपलब्ध तरतुदींचा योग्य वापर करणे आवश्यक आहे. विशेषतः कलम १०१, ९१ आणि १३८ अंतर्गत उपलब्ध अधिकारांचा वेळेवर उपयोग केल्यास वसुली प्रक्रिया अधिक गतिमान व प्रभावीपणे राबविता येते. त्याचबरोबर सहकार कायद्यात सातत्याने होत असलेले बदल आणि उपविधींची माहिती पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी अद्ययावत ठेवणे गरजेचे आहे. यावेळी महेंद्र घोडके यांनी कायदेशीर बाबी, लेखापरीक्षण अहवाल, कर्मचारी व व्यवस्थापकांच्या जबाबदाऱ्या, संस्थेच्या प्रशासनातील बदलते नियम तसेच पतसंस्थांच्या दैनंदिन कामकाजातील विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी लेखापरीक्षणातील त्रुटी टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी, अभिलेखांचे योग्य व्यवस्थापन, कर्जप्रकरणांची हाताळणी आणि कायदेशीर प्रक्रियेबाबतही उपस्थितांना माहिती दिली.परिसंवादात सहभागी पदाधिकारी, सचिव, व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांनी वसुली प्रक्रिया, कायदेशीर अडचणी, लेखापरीक्षणातील निरीक्षणे तसेच सहकार विभागाच्या नव्या सूचनांबाबत विविध प्रश्न उपस्थित केले. त्यावर तज्ज्ञांनी सविस्तर उत्तरे देत शंकांचे निरसन केले. सहकार कायद्यात सातत्याने होत असलेले बदल लक्षात घेऊन सहाय्यक निबंधक कार्यालयाच्या वतीने गेल्या वर्षभरात आयोजित करण्यात आलेले हे तिसरे चर्चासत्र होते. यापूर्वीच्या चर्चासत्रांप्रमाणेच याही परिसंवादाला तालुक्यातील नागरी, ग्रामीण व सेवक सहकारी पतसंस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## मुंगसापूर येथील महाराजाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यासाठी आंदोलन

### कन्नड पंचायत समितीसमोर सोमवारपासून उदय गवळी यांचे आंदोलन

कन्नड। प्रतिनिधी

तालुक्यातील मुंगसापूर (जेहूर) येथील आश्रमात जनतेची फसवणूक करून अनधिकृतपणे वैद्यकीय उपचार करणाऱ्या महाराजाविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात यावा, या मागणीसाठी उदय गवळी आणि शेतकरी बबनराव पवार यांनी सोमवारपासून पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी कार्यालयासमोर बेमुदत सत्याग्रह आंदोलन सुरू केले आहे.



आंदोलक उदय गवळी व बबनराव पवार यांनी सांगितले की, मुंगसापूर येथील धोंडूकोंडू वाडी येथील गट क्रमांक १७ आणि १८ मधील १६ एकर शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून तेथे आश्रम अनधिकृतपणे उभारण्यात आला आहे. या आश्रमाच्या चालकाने महसूल विभागाच्य गायरान जागेवर अतिक्रमण करून अनधिकृत बांधकाम केले आहे. यापूर्वी प्रादेशिक वन विभागाच्या जमिनीतून बेकायदेशीर गौण खनिज उपसा केल्याप्रकरणी तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी रोहिणी साळुंखे यांनी १० मे २०२३ रोजी कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्यात ११ जणांविरोधात गुन्हा नोंदवला आहे. तसेच शेतकरी बबनराव पवार यांच्या तक्रारीवरून १ एप्रिल २०२६ रोजी मुकुंद पाटील व त्याच्या इतर सहकाऱ्यांवर मारहाण व दमदाटीचे गुन्हे दाखल आहेत. आश्रमाच्या जागेवर बेकायदेशीर हेलिपॅडही तयार करण्यात आले आहे. वैद्यकीय पदवी नसताना या ठिकाणी रुग्णांवर उपचार केले जात होते. दरम्यान, महाराज सध्या फोनवर बोलत नाहीत. प्रत्यक्ष भेटीसाठी सोमवारचा दिवस निश्चित केला आहे. रीतसर परवानगी घेऊन सोमवारी महाराज बोलतील असे आश्रमाचे व्यवस्थापक संजय फोलाने यांनी सांगितले. वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन कायदेशीर कारवाई होणार मी सध्या शासकीय कामानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथे आहे. बुधवारी कन्नड येथे परत आल्यानंतर, छाप्यादरम्यान तयार करण्यात आलेल्या अहवालाचे अवलोकन केले जाईल. यानंतर वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन संबंधितांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे गटविकास अधिकारी तथा तालुकास्तरीय अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय शोध मोहीमेचे ओमप्रकाश रामावत यांनी सांगितले.

## गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देणे मोठी सामाजिक जबाबदारी- डीवायएसपी रेंगे

### परतूर येथे आधारवड फाउंडेशनतर्फे गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप




परतूर। प्रतिनिधी

समाजातील गरजू विद्यार्थ्यांना योग्य वेळी मदतीचा हात देणे ही मोठी सामाजिक जबाबदारी आहे. आधारवड फाउंडेशनचे संस्थापक श्याम वाढेकर यांनी शिक्षण आणि समाजकारणाच्या क्षेत्रात उभारलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे. त्यांच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा मार्ग सुकर झाला आहे. या मदतीचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी केवळ शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे. असे आवाहन उपविभागीय पोलिस अधिकारी रामेश्वर रेंगे यांनी केले. आधारवड फाउंडेशन पुरस्कृत 'कर्तव्य' फाउंडेशनच्या वतीने सोमवारी गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांतील पाल्य, अनाथ, दिव्यांग तसेच विधवा व परित्यक्ता महिलांच्या मुलांना यावेळी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या वेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला मुख्याध्यापक लव बिरादार, पंडित निर्वळ, भाऊसाहेब मुके, डॉ. पांडुरंग नवल, बालाजी ढोबळे, राजकुमार भारुका यांची उपस्थिती होती. उपविभागीय पोलिस अधिकारी रेंगे म्हणाले, विद्यार्थ्यांनी मोबाइलचा आवश्यक तेवढाच वापर करावा. सोशल मीडियाचा अनावश्यक मोह टाळावा.

व्यसनांपासून दूर राहावे. वाईट सवयींपासून दूर राहावे. आपल्या ध्येयासाठी सातत्याने परिश्रम घ्यावेत. गरीब पालकांच्या कष्टांची जाणीव ठेवावी. शिक्षणाच्या बळावर स्वतःचे आणि कुटुंबाचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी प्रयत्नशील राहावे. असा संदेश त्यांनी दिला. यावेळी मुख्याध्यापक लव बिरादार आणि डॉ. पांडुरंग नवल यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षण हेच जीवनात यश मिळविण्याचे प्रभावी साधन आहे. विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास करावा. शिस्त पाळावी. सकारात्मक विचारसरणी जोपासावी. असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आधारवड फाउंडेशनचे कोषाध्यक्ष सचिन चव्हाण, संतोष खंडागळे, भानुदास टिप्परकर, श्याम काकडे, नितीन मुजमुले, गजानन राहेकर, अतुल देशमुख, योगेश कपाळे आदींनी परिश्रम घेतले. १०५ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचा लाभ : आधारवड फाउंडेशन पुरस्कृत 'कर्तव्य' फाउंडेशनच्या या उपक्रमातून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांतील पाल्य, अनाथ, दिव्यांग तसेच विधवा व परित्यक्ता महिलांच्या १०५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. शिक्षणाच्या प्रवासात आर्थिक अडचणी अडथळा ठरू नयेत, या उद्देशाने राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक करत भविष्यातही अशा उपक्रमांना सातत्य देण्याची अपेक्षा व्यक्त केली.

## श्रीक्षेत्र आन्वा येथील मानाच्या दिंडीचे पंढरीकडे प्रस्थान

### टाळ-मृदंगाच्या गजरात विठ्ठलनाम, 'ज्ञानोबा-तुकाराम'चा जयघोष

आन्वा। प्रतिनिधी

'जावे पंढरीसी आवडे मानसी' या संतवचनाचा जयघोष करीत प्रतिपंढरपूर म्हणून ओळख असलेल्या भोकरदन तालुक्यातील श्रीक्षेत्र आन्वा येथून संत सद्गुरू श्री विठोबादादा महाराज चातुर्मास्ये, श्रीविठ्ठल-रुक्मिणी संस्थानची मानाची पायी दिंडी मंगळवारी दुपारी १२.३० वाजता पंढरपूरकडे मार्गस्थ झाली. टाळ-मृदंगाच्या गजरात विठ्ठलनाम, 'ज्ञानोबा-तुकाराम'चा जयघोष झाला. परिसर भक्तिमय झाला. श्रीसंस्थानचे पंधरावे विद्यमान पीठाधीश परमपूज्य सद्गुरू श्रीज्ञानेश्वर माउली महाराज चातुर्मास्ये यांच्या प्रमुख उपस्थितीत दिंडीला सुरुवात झाली. दिंडी सोहळा प्रमुख कैवल्य महाराज चातुर्मास्ये, राधेश्याम महाराज चातुर्मास्ये, नित्यानंद महाराज आदी उपस्थित होते.



या दिंडीला सुमारे २७२ वर्षांची परंपरा आहे. सन १७३० मध्ये संत सद्गुरू श्री विठोबादादा महाराज चातुर्मास्ये यांनी स्वतः सलग १२ वर्षे पायी वारी पूर्ण केली. त्यानंतर भगवान श्री पांडुरंग परमात्म्याच्या आज्ञेनुसार पंढरपूर येथे चातुर्मास कीर्तनसेवा सुरू केली. आषाढी ते कार्तिकी या काळात चातुर्मास सेवा, कीर्तनाची परंपरा सुरू झाली. गेल्या पंधरा पिढ्यांपासून ही परंपरा अखंड सुरू आहे. विद्यमान पीठाधीश दरवर्षी चार महिने पंढरपूर येथे वास्तव्य करून धार्मिक सेवा बजावतात. पंढरपूर येथील चंद्रभागा नदीच्या तीरावर असलेल्या श्री चातुर्मास्ये महाराज मठात संतश्री विठोबादादा महाराज, सद्गुरू श्री मैराळ महाराज यांच्या समाधी आहेत. चातुर्मास काळात मठात दररोज काकडा भजन, श्रीमद्भागवत कथा, गाथा भजन, हरिपाठ होतो. सायंकाळी पीठाधीश महाराजांचे कीर्तन होते. या परंपरेला वारकरी संप्रदायात विशेष महत्त्व आहे. यंदाची दिंडी श्रीक्षेत्र आन्वा येथून सिल्लोडकडे जाईल. पुढे आळंद, फुलंब्री, हर्सूल, नक्षत्रवाडी, कौटगाव असा मार्ग असेल. श्रीक्षेत्र पैठण, सोनविहीर, लाडजळगाव, मातोरी, बावी, उंबरविहीर येथे मुक्काम होईल. पुढे पारगाव घुमरा, जायभायवाडी, तिंत्रज, रत्नापूर, जुने डोमगाव, लोणी असा प्रवास असेल. श्रीक्षेत्र लहूळ, आष्टी मार्गे दिंडी पंढरपूरकडे जाईल. सहा जिल्ह्यांतून सुमारे ४५० किलोमीटरचा पायी प्रवास होईल. हा प्रवास २२ दिवसांत पूर्ण होईल. दिंडी २१ जुलै रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे दाखल होणार आहे. श्रद्धा, भक्ती, परंपरा, वारकरी संस्कृतीचा वारसा जपणारी ही मानाची दिंडी हजारो भाविकांसाठी प्रेरणा ठरत आहे. भोकरदन तालुक्यातील प्रतिपंढरपूर श्रीक्षेत्र आन्वा येथील मानाच्या दिंडीचे पंढरीकडे प्रस्थान झाले. चातुर्मासात रोज कीर्तनसेवा शांतिब्रह्म संत एकनाथ महाराजांचे पणजोबा संत भानुदास महाराजांचे अवतारकार्य पूर्ण झाल्यानंतर चातुर्मासात कीर्तनसेवा कोण करणार, असा प्रश्न निर्माण झाला होता. त्यानंतर साक्षात भगवान श्री पांडुरंग परमात्म्याच्या आदेशानुसार चातुर्मासात दररोज कीर्तन करण्याची श्रीपरंपरा सुरू झाली. आजही श्रीक्षेत्र पंढरपूर येथे ही परंपरा अखंडपणे सुरू आहे अशी माहिती दिंडी सोहळा प्रमुख कैवल्य महाराज चातुर्मास्ये यांनी दिली.

## हिंगोलीच्या कळमनुरीत एसआयआर सर्वेक्षणाला वेग

हिंगोली। प्रतिनिधी

कळमनुरी विधानसभा मतदारसंघात विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) सर्वेक्षणाची प्रक्रिया वेगाने सुरू असून प्रशासनाने मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि पारदर्शक करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली असून ९३ टक्के मतदारांचे मॅपींगचे काम पूर्ण झाले आहे. ३४५ मतदान केंद्रासाठी ३४५ केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती उपविभागीय अधिखारी प्रतिक्षा भुते यांनी दिली आहे. कळमनुरी विधानसभा मतदारसंघात एकूण ३ लाख २४ हजार मतदार नोंदणीकृत आहेत. यापैकी तब्बल ९३ टक्के म्हणजेच सुमारे २ लाख ९४ हजार मतदारांचे मॅपिंगचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित सुमारे ३० हजार मतदारांचे मॅपिंग येत्या काही दिवसांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने निश्चित केले आहे.

मतदारसंघातील एकूण ३४५ मतदान केंद्रांसाठी बीएलओ (बूथ लेव्हल ऑफिसर) कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून प्रत्येक कर्मचाऱ्याला त्यांच्या कार्यक्षेत्रातील मतदारांची प्रत्यक्ष भेट घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. घराघरात जाऊन मतदारांची माहिती अद्ययावत करणे, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे आणि अर्जांचे वितरण करणे ही जबाबदारी बीएलओंकडे सोपविण्यात आली आहे. या प्रक्रियेवर तहसीलदार जीवककुमार कांबळे यांचे लक्ष असणार आहे. या विशेष मोहिमेअंतर्गत बीएलओ कर्मचारी पुढील पाच दिवस मतदारांच्या घरी भेटी देऊन आवश्यक अर्जांचे वितरण करणार आहेत. त्यानंतर पुढील पाच दिवसांच्या कालावधीत संबंधित मतदारांनी अर्ज भरून आवश्यक कागदपत्रांसह बीएलओंकडे जमा करणे अपेक्षित आहे. अर्जासोबत पासपोर्ट आकाराचा फोटो, ओळखपत्र तसेच निवडणूक आयोगाने निर्धारित केलेली अन्य कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहणार असल्याचे भुते यांनी सांगितले.

मतदार यादीतील नावे, पत्ते, कौटुंबिक माहिती आणि इतर तपशील अचूक राहावेत यासाठी ही प्रक्रिया महत्त्वाची असून कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी निर्माण होऊ नयेत, यासाठी प्रशासन विशेष दक्षता घेत आहे. बीएलओ कर्मचारी आपल्या घरी भेट देतील तेव्हा त्यांना आवश्यक ती माहिती, कागदपत्रे आणि सहकार्य करण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भुते यांनी केले आहे.

## औराळ्याचा पशुवैद्यकीय दवाखाना १५ दिवसांपासून बंद

### खासगी उपचारांमुळे शेतकऱ्यांची आर्थिक लूट



औराळा। प्रतिनिधी

कन्नड तालुक्यातील औराळा येथे शासनाने ३० लाख खर्च करून पशुवैद्यकीय दवाखान्याची सुसज्ज इमारत उभारली खरी, मात्र प्रशासकीय अनास्थेमुळे गेल्या १० ते १५ दिवसांपासून हा दवाखाना बंद अवस्थेत आहे.ऐन पावसाळ्याच्या तोंडावर जनावरांचे आजार वाढत असतानाच दवाखान्याला कुलूप असल्याने औराळा आणि परिसरातील शेतकरी व पशुपालक मोठ्या संकटात सापडले आहेत.

या दवाखान्यात एक महिला अधिकारी आणि एक कम्पाऊंडर कार्यरत आहेत. मात्र, ते कधी येतात आणि कधी जातात, याचा कोणताही नेम नाही. दवाखान्याच्या बाहेर कोणताही नामफलक किंवा सेवा माहिती फलक लावलेला नाही. त्यामुळे औराळा, औराळा तांडा, शिरोडी, कविटखेड, हसनखेड, गव्हाली, धनगरवाडी, विटा, निपाणी या परिसरातील शेतकऱ्यांना आपल्या गायी, म्हशी, बैल आणि शेळ्यांच्या उपचारासाठी खाजगी डॉक्टरांना पाचारण करावे लागत आहे. यामुळे गरीब शेतकऱ्यांना नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असून जनावरांच्या जिवालाही धोका निर्माण झाला आहे. औराळा येथील श्रेणी-१ दवाखान्यासोबतच जेहूर आणि चापानेर येथील श्रेणी-२ च्या दवाखान्यांचा अतिरिक्त कार्यभारही येथीलच अधिकाऱ्यांकडे आहे. एकाच अधिकाऱ्याकडे तीन-तीन ठिकाणची जबाबदारी असल्याने आणि लंपी आजाराच्या लसीकरणाचे कारण पुढे केले जात असल्याने औराळा येथील मुख्य दवाखानाच कुलूपबंद ठेवण्यात आला आहे. यामुळे जिल्हा परिषद प्रशासन या समस्येकडे गांभीर्याने पाहणार का, असा संतप्त सवाल विचारला जात आहे. औराळा, जेहूर आणि चापानेर येथील पशुवैद्यकीय दवाखान्यांना केवळ कागदावर प्रभार न देता, त्या ठिकाणी कायमस्वरूपी पशुवैद्यकीय अधिकारी आणि कम्पाऊंडरची नियुक्ती करण्यासाठी शासनाकडे तातडीने पाठपुरावा करावा,अशी मागणी आहे. अधिकारी हजर नसल्याने पशुपालकांची गैरसोय औराळा येथे श्रेणी-१ चा दवाखाना असूनही कर्मचाऱ्यांअभावी तो शोभेची वस्तू बनला आहे. गेल्या १५ दिवसांपासून येथे कोणीही फिरकलेले नाही. शासनाने तात्काळ येथे कायमस्वरूपी डॉक्टर द्यावेत, अशी मागणी ग्रामस्थ सुभाष रिंढे यांनी केली. औराळा, जेहूर आणि चापानेर येथील पशुवैद्यकीय दवाखान्यांना केवळ कागदावर प्रभार न देता, त्या ठिकाणी कायमस्वरूपी पशुवैद्यकीय अधिकारी आणि कम्पाऊंडरची नियुक्ती करण्यासाठी शासनाकडे तातडीने पाठपुरावा करावा, अशी मागणी पशुपालकांमधून करण्यात येत आहे.

# आम्हाला लाईनमन म्हणून हिणवू नका

## खा.ओमराजे निंबाळकरांची कथित ऑडिओ क्लिप व्हायरल, तरुण शेतकऱ्याचा थेट सवाल

धाराशिव। प्रतिनिधी

नुकतेच ठाकरे गटाची साथ सोडून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केलेले धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर आणि एका तरुण शेतकऱ्यामधील संभाषणाची ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. एका ट्रान्सफॉर्मर बसवण्याच्या प्रश्नावरून या तरुणाने खासदारांना थेट जाब विचारला असता, ओमराजेंनी ''आम्हाला लाइनमन म्हणून हिणवू नका,'' असे वक्तव्य केल्याचे या क्लिपमध्ये ऐकायला मिळत आहे. तसेच, त्यांनी आपल्या पक्षांतराचे (शिंदे गटात जाण्याचे) समर्थन करताना, विरोधात असताना येणाऱ्या अडचणींचा पाढाच या तरुणासमोर वाचला आहे. या ऑडिओ क्लिपमुळे राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू झाली असून, नेटकऱ्यांकडून ओमराजेंवर टीकेची झोड उठवली जात आहे. दिव्य मराठी या ऑडिओ क्लिपची पुष्टी करत नाही.

व्हायरल झालेल्या कॉल रेकॉर्डिंगनुसार, एका तरुण शेतकऱ्याने शेतातील डीपीच्या (ट्रान्सफॉर्मर) समस्येबाबत खासदार ओमराजे निंबाळकर यांना फोन केला होता. तरुण म्हणाला, ''दादा, एका डीपीसाठी जर शेतकऱ्याला ५० ते १०० चकरा माराव्या लागत असतील, तर कसं होणार? बाकीचे विकासाचे मुद्दे तर मागेच राहतील. तुम्ही लाईनमन म्हणाल्याचा राग येऊ देऊ नका. यावर ओमराजेंनी सांगितले, मला लाईनमन म्हणून हिणवू नका.'' पुढे त्यांनी भूतकाळातील परिस्थितीचा संदर्भ देत म्हटले, ''आम्ही जेव्हा विरोधात (ठाकरे गटात) होतो, तेव्हा परिस्थिती कशी होती ते विचार लोकांना. विरोधात असताना साधी डीपीही बसवता येत नव्हती. तरुणाने प्रतिसवाल करत म्हटले, ''विरोधात अनेकांनी अनेक वर्षे काम केलं आहे दादा, तुम्ही एकटेच नव्हतात. यावर ओमराजेंनी थेट आपल्या शिंदे गटातील प्रवेशाचे कारण स्पष्ट केले. ते म्हणाले, ''विरोधात बऱ्याच जणांनी बरीच वर्षे काम केलं,



पण विरोधात राहून असा जो पराभव झाला विधानसभेला आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांना, तसा पराभव आधी कधीच झाला नव्हता.'' (येथे ते महाविकास आघाडी सरकारच्या काळात किंवा ठाकरे गटात असताना स्थानिक पातळीवर झालेल्या पराभवांबद्दल खंत व्यक्त करत असल्याचे दिसतात).

काही दिवसांपूर्वीच धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांच्यासह ठाकरे गटाच्या एकूण ६ खासदारांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. या 'ऑपरेशन टायगर'मुळे राज्यभरात मोठी खळबळ उडाली होती. बंडखोरीनंतर उद्धव ठाकरे यांनी तातडीने या सर्व बंडखोर खासदारांच्या मतदारसंघांचे (धाराशिवसह) दौरे करून शिवसैनिकांशी संवाद साधला होता. या दौऱ्याची चर्चा ताजी असतानाच, आता ओमराजेंची ही ऑडिओ क्लिप समोर आल्याने नवी चर्चा सुरू झाली आहे.

ही ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर सोशल मीडियावर नेटकऱ्यांनी ओमराजे निंबाळकर यांच्यावर निशाणा साधला आहे. ''लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या समस्या सोडवणे अपेक्षित असताना, तुम्ही 'विरोधात असल्याच्या' सबबी का सांगत आहात?'' असा सवाल नेटकरी विचारत आहेत. तर दुसरीकडे, सत्ताधारी पक्षात जाऊनही जर शेतकऱ्यांना एका डीपीसाठी ५०-१०० चकरा माराव्या लागत असतील, तर पक्ष बदलून नक्की काय साध्य केले? असा थेट सवालही विरोधकांकडून आणि सामान्य जनतेकडून उपस्थित केला जात आहे. सध्या या व्हायरल क्लिपवर खासदार ओमराजे निंबाळकर यांनी अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया किंवा स्पष्टीकरण दिलेले नाही. मात्र, या एका संवादाने त्यांच्या पक्षांतराच्या कारणांवरून आणि जनसंपर्कावरून पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापले आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

गुरुवार दि.०२ जुलै २०२६


# ज्ञानराधा ठेवीदारांचा प्रश्न गंभीर: आ. सुरेश धस यांचा पावसाळी अधिवेशनात आक्रमक पवित्रा

पाटोदा (बीड) प्रतिनिधी:

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीमधील आर्थिक गैरव्यवहाराने राज्यातील ६.५ लाख ठेवीदारांचे संसार उघड्यावर आले आहेत. या गंभीर विषयावर बीडचे आमदार सुरेश धस यांनी नुकत्याच पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनात सरकारला धारेवर धरत ठेवीदारांच्या हक्कासाठी आक्रमक भूमिका घेतली आहे.

कायदेशीर त्रुटींचा गैरफायदा

सभागृहात बोलताना आ. धस यांनी मल्टीस्टेट संस्थांच्या कार्यपद्धतीतील त्रुटींवर बोट ठेवले. केंद्र सरकारकडून परवाना मिळत असला तरी, महाराष्ट्रात काम करताना राज्य सरकारची ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची कोणतीही सक्ती नाही. या पळवाटेचा फायदा घेत संस्था चालक गोरगरिबांचे पैसे लुटून दुबईसारख्या देशात पसार होत आहेत, तर त्यांचे




उद्योग मात्र भारतात बिनदिक्कत सुरू आहेत. यावर केंद्र आणि राज्य सरकारने कडक नियंत्रण ठेवण्याची गरज असल्याचे धस यांनी ठणकावून सांगितले.

आ. धस यांचा ठोस ॲक्शन प्लॅन

केवळ प्रश्न उपस्थित न करता, आ. धस यांनी सरकारला खालीलप्रमाणे ठोस मार्गही सुचवले आहेत:

१. मालमत्तेचा लिलाव: ईडी, सीबीआय आणि पोलिसांनी जप्त केलेल्या मालमत्तांचा लिलाव त्वरित पूर्ण करावा. २. परताव्याची हमी: लिलावातून जमा झालेला निधी १ ते १.५ वर्षांच्या आत ठेवीदारांना वाटप करावा. ३. प्रशासकीय जबाबदारी: पोलीस विभागाने उडवाउडवीची उत्तरे न देता, या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करून प्रशासकीय उत्तरदायित्व सिद्ध करावे.

ठेवीदारांच्या अपेक्षा उंचावल्या

बीड जिल्ह्यातील हजारो कुटुंबांचा घाम गाळून कमावलेला पैसा या फसवणुकीत अडकला आहे. अशा कठीण प्रसंगी लोकप्रतिनिधी म्हणून आ. सुरेश धस यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे ठेवीदारांमध्ये काहीशी आशा निर्माण झाली आहे. आता सरकार या सूचनांवर काय निर्णय घेते आणि ठेवीदारांना त्यांचे हक्काचे पैसे कधी मिळतात, याकडे संपूर्ण पाटोदा तालुक्यासह जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# परळी धर्मापुरी रस्त्यावर सिमेंट फॅक्टरी रेल्वे फाटकावर होणार ५७ कोटींचा उड्डाणपूल

## आ.धनंजय मुंडेंनी दिलेला शब्द पाळला

## उड्डाण पुलामुळे वाहतूक होणार सुरळीत, धनंजय मुंडेंचा यशस्वी पाठपुरावा

परळी । प्रतिनिधी

धनंजय मुंडे यांच्या यशस्वी पाठपुराव्यामुळे परळी वैद्यनाथ विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रीय महामार्ग मधील परळी ते धर्मापुरी रस्त्यावरील सिमेंट फॅक्टरी परिसरातील रेल्वे फाटक -२४ येथे रेल्वे उड्डाण पूल बांधण्याच्या ५६.२८ कोटी रुपयांच्या कामास



केंद्र सरकारने प्रशासकीय मान्यता दिली असून तातडीने निविदा प्रक्रिया राबविण्याचे निर्देश केंद्र सरकारने दिले आहेत.

माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी याबाबत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या कडे याबाबत यशस्वी पाठपुरावा केला आहे.

सिमेंट फॅक्टरी परिसरातील रेल्वे फाटक स्थळी रेल्वे आल्यानंतर अगदी तासनतास वाहतूक ठप्प असायची, तसेच अनेक लहानमोठे अपघात घडत असत. मात्र आता हा प्रकल्प उभारल्याने संपूर्ण वाहतूक सुरळीत होणार आहे.

धनंजय मुंडे यांनी याबाबत नितीन गडकरी यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती. दरम्यान हा प्रकल्प मंजूर केल्यानंतर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी अजितदादा पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंदर राजे भोसले, मंत्री पंकजाताई मुंडे यांसह केंद्र व राज्य शासनाचे आभार मानले आहेत.

# लोकनेते विनायकराव मेटे यांच्या जयंतीनिमित्त बाजारसमितीत वृक्षारोपण

बीड । प्रतिनिधी

लोकनेते विनायकराव मेटे यांच्या जयंतीनिमित्त बीड येथील कृषी उत्पन्न बाजार समिती तसेच लोकनेते विनायकराव मेटे रेशीम कोष खरेदी-विक्री बाजारपेठ परिसरात वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात पार पडला. शिवसंग्रामच्या अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे आणि आशुतोष विनायकराव मेटे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती सरलाताई मुळे, उपसभापती श्यामसुंदर पडोळे, संचालक विश्वासराव आखाडे, उद्धवजी पैठणे, दीपकराव काळे, राधेश्याम कासट, हनुमान जगताप, वैभव मुळे तसेच सचिव बाळासाहेब जाधव यांच्यासह बाजार समितीचे पदाधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी नारायणराव काशीद, अनिल घुमरे पाटील, भिवंडी चे जिल्हाध्यक्ष इंद्रजीत घाडगे,सुहास पाटील, मजूर सहकारी संस्थेचे संचालक बाळासाहेब हावाळे, माजलगाव शिवसंग्रामचे तालुकाध्यक्ष उत्तमराव पवार, ◀◀ पान ३ वर



# धर्मदाय कार्यालयातील अभिलेख आता एका क्लिकवर

बीड । प्रतिनिधी

धर्मदाय उप आयुक्त, बीड म्हणून पदभार स्वीकारताच कांचन गंगा जाधव (सुपाते) यांनी कार्यालयीन कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान व नागरिकाभिमुख करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. कार्यालयातील अनेक वर्षांपासून जतन करण्यात आलेल्या अभिलेखांचे डिजिटलायझेशन करण्याच्या कामाला त्यांनी तातडीने सुरुवात केली असून या उपक्रमामुळे भविष्यात आवश्यक माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.



धर्मदाय विभागाकडे सार्वजनिक न्यासांची नोंदणी, मालमत्तेची माहिती, बदल अहवाल, चौकशी, न्यायप्रविष्ट प्रकरणे तसेच विविध प्रशासकीय नोंदींचा मोठा अभिलेख साठा आहे. आजपर्यंत या कागदपत्रांचा वापर प्रामुख्याने कागदी स्वरूपात होत असल्याने माहिती शोधण्यासाठी बराच वेळ लागत होता. डिजिटलायझेशनमुळे ही प्रक्रिया अधिक वेगवान आणि सुलभ होणार आहे.

या उपक्रमाअंतर्गत सर्व महत्त्वाचे अभिलेख स्कॅन करून संगणकीय प्रणालीमध्ये सुरक्षित स्वरूपात संग्रहित केले जाणार आहेत. त्यामुळे कोणत्याही प्रकरणाची माहिती किंवा आवश्यक कागदपत्रे काही क्षणांत उपलब्ध होतील. यामुळे कार्यालयीन कामकाजात गती येण्याबरोबरच नागरिक, वकील, संस्थांचे पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा वेळही मोठ्या प्रमाणात वाचणार आहे.

डिजिटलायझेशनमुळे अभिलेखांची सुरक्षितताही वाढणार आहे. जुनी कागदपत्रे खराब होणे, हरवणे किंवा नैसर्गिक आपत्तींमध्ये नुकसान होण्याचा धोका ◀◀ पान ३ वर

# किल्ले धारूर नगरपरिषदेचा अतिरिक्त कारभार आता तहसीलदार श्रीकांत निळे यांच्याकडे

किल्ले धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर नगर परिषदेचे मुख्य अधिकारी पद हे रिक्त असल्याने नगरपरिषदेचे प्रशासकीय कामकाज सुरळीत चालावे म्हणून किल्ले धारूर नगरपरिषदेचा अतिरिक्त कारभार तहसीलदार श्रीकांत निळे यांच्याकडे पुढील आदेशापर्यंत सोपवण्यात आला आहे. यामुळे नगर परिषदेचे काही प्रमाणात विस्कटलेली कामे सुरळीत होणार आहेत.



दि.१७ जून रोजी येथील नगर परिषदेचे मुख्यअधिकारी आशुतोष चिंचाळकर यांची बदली वसमत नगरपरिषद येथे झाल्याने किल्ले धारूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी पद हे रिक्त होते त्यामुळे काही प्रमाणात येथील प्रशासकीय कामकाज मंदावले होते.तसेच प्रशासकीय काम आज करण्यास अडचण निर्माण होत होती त्यामुळे प्रशासकीय काम सुरळीत व्हावे म्हणून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दि.३० जून रोजी तहसीलदार श्रीकांत निळे यांना आदेश काढून किल्ले धारूर नगरपरिषदेचा मुख्याधिक्य पदाचा अतिरिक्त कारभार पुढील आदेश येईपर्यंत स्वीकारण्याचे सांगितले आहे. त्यामुळे आता किल्ले धारूर नगर परिषदेचा मुख्यअधिकारी पदाचा अतिरिक्त कारभार तहसीलदार श्रीकांत निळे हे पाहणार आहेत यामुळे येथील प्रशासकीय कामांना गती मिळून नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

# लावलेली रोपे जगविणे ही प्रत्येकाची जबाबदारी -कुटे महाराज

बीड । प्रतिनिधी

अनेकदा उत्साहात वृक्षारोपण केले जाते,मात्र या रोपांचे संगोपण होत नाही, आपण लावलेली जगविणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन हभप राजाभाऊ महाराज कुटे यांनी केले. ते,गेवराई तालुक्यातील पाचेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते संजय भाऊ जाधव यांनी आयोजित केलेल्या वृक्षारोपण करता वेळी केले. संजय जाधव दरवर्षी वृक्षारोपण करुन झाडे जगवित असल्याने त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

यावेळी भाऊसाहेब जरांगे पाटील, हभप राजाभाऊ कुटे महाराज, दिनेश गुळवे, राहुल लोंढे, अशोक हाटवटे, संजय हाटवटे, देवीदास चव्हाण, रामकिसन मदने, बालासाहेब शेरकर, गणेश हाडुळे, दिपक जाधव, देविदास अण्णा वाणी, गणेश बरबडे, महेश खरसाडे, सिद्धेश्वर काटकर, गणेश पिंपिंगळे, बाळासाहेब डरपे, शाहू चव्हाण, विकास दरेकर, शिवनाथ गोगुले, अंगद फुलझळके, सुरेश फुलझळके, प्रवीण फुलझळके, सतीश ढगे, ◀◀ पान ३ वर

## टाटा मेमोरियल मार्फत ‘गुरूकृपा’मध्ये विभागीय प्रशिक्षण

# तीन जिल्ह्यातील डॉक्टर करणार मृत्युंच्या कारणांच्या वैद्यकीय प्रमाणपत्रांवर चर्चा

माजलगाव । प्रतिनिधी

टाटा मेमोरियल केंद्र या कॅन्सरच्या क्षेत्रातील अंतरराष्ट्रीय किर्तीच्या संस्थेमार्फत माजलगावच्या गुरूकृपा शिक्षण समुहात तीन जिल्ह्यातील डॉक्टरांसाठी विभागीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. मृत्युंच्या कारणांचे वैद्यकीय प्रमाणपत्र या विषयांवर बीड, जालना, परभणी या तीन जिल्ह्यातील डॉक्टरांना तज्ञांच्या



टीममार्फत मार्गदर्शन केले जाणार आहे.

माजलगावच्या गुरूकृपा शिक्षण समुहाच्या माध्यमातून नवनवीन उपक्रम हाती घेतले जात असतात. याचाच एक भाग म्हणून गुरूकृपा शिक्षण समुहात शनिवार दि.४ जुलै रोजी तीन जिल्ह्यातील डॉक्टरांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. मृत्युंच्या कारणांचे वैद्यकीय प्रमाणपत्र या विषयावर यात मार्गदर्शन केले जाणार आहे. बीड, जालना आणि परभणी या तीन जिल्ह्यातील शासकीय रूग्णसेवेतील डॉक्टर यात ◀◀ पान ३ वर

# वसंतराव नाईक यांचे कार्य शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी -ज्योत्स्ना मुळीक

माजलगाव । प्रतिनिधी

हरित क्रांतीचे प्रणेते व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतरावजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिनानिमित्त पंचायत समिती, माजलगाव येथे आयोजित कार्यक्रमात त्यांच्या कृषी क्षेत्रातील योगदानाला उजाळा देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा तथा गटविकास अधिकारी श्रीमती ज्योत्स्ना मुळीक यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, ‘‘कै. वसंतरावजी नाईक यांनी मुख्यमंत्री म्हणून कार्यरत असताना




कृषी शिक्षण व संशोधन, पंचायत राज, रोजगार हमी योजना, कापूस एकाधिकार योजना, जलसंधारण तसेच औद्योगिकीकरण यांसारख्या महत्त्वपूर्ण योजना राबवून राज्यातील शेतकऱ्यांच्या विकासाला नवी दिशा दिली. त्यांचे कार्य आजही शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी आहे.‘‘कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी उपविभागीय कृषी अधिकारी श्रीमती श्रद्धा भवारी यांनी बदलत्या हवामानाचा विचार करून हवामान अनुकूल तंत्रज्ञानावर आधारित शेती करण्याचे आवाहन शेतकऱ्यांना केले.तालुका कृषी अधिकारी गणेश बादाडे यांनी माजलगाव तालुक्यात खरीप हंगामात राबविण्यात येणाऱ्या विविध पिकांच्या प्रात्यक्षिक प्रकल्पांची माहिती देत प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया योजनेविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषी अधिकारी एस. एस. भोकरे यांनी केले. यावेळी मंडळ कृषी अधिकारी श्री अतिश चाटे (केसापुरी), व्ही. वाय. डोंगरे (गट विकास अधिकारी), पुरस्कारप्राप्त शेतकरी ◀◀ पान ३ वर

# सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी ही राष्ट्रीय संपत्ती -दळवी

बीड । प्रतिनिधी

शासकीय सेवेत कार्यरत असताना आपल्या कर्तव्य निष्ठेने आणि समर्पणाने समाजाच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान देणारे निवृत्त अधिकारी व कर्मचारी हे समाजाचे आधारस्तंभ असून त्यांच्या प्रदीर्घ सेवेतून प्राप्त झालेला अनुभव ज्ञान आणि जीवनमूल्य व समाजाच्या प्रगतीसाठी प्रेरणादायी ठरेल असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी व कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष तथा रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी (भाप्रसे) से. नि.यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य




कृतिशील अधिकारी कर्मचारी संघटनेच्या पाचवी वार्षिक सर्वसाधारण सभा पुणे येथील उद्यानप्रसाद सभागृहात आयोजित केली हाती त्या वेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी यशदाचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड, संभाजीनगर विभागाचे से.नि.आयुक्त उमाकांत दांगट, इंजिनीयर व्यंकटराव गायकवाड, डीडी देशमुख, रमेशआत्राम, अशोक पाटील, रवींद्र धोंगडे, अरुण कांबळे, बाळासाहेब गोरे ,कार्याध्यक्ष मनोहर पोकळे इत्यादी व्यासपीठावर उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य कृतीशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना निवृत्त वेतनधारकांची संघटना असून त्यात कृतिशील व्यक्तींना एकत्र आणून त्यांच्या दीर्घ सेवेतील अनुभवाचा लाभ समाजातील नागरिकांना मिळावा व त्यांची प्रकृती स्वास्थ्यासाठी ते कार्यरत राहावे असे सांगून शासनाच्या विविध योजना व त्याचा लाभ कसा घ्यावा सेवानिवृत्तांचे प्रश्न सोडण्याबरोबरच त्यांच्या वैयक्तिक अडी अडचणी सोडण्यावर विशेष भर दिला जात असून विविध नाविन्यपूर्ण उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

# कला ही जीवन समृद्ध करते -उद्घाटक डॉ.राजेश इंगोले

## आर.डी.बर्मन यांच्या जयंतीनिमित्त विश्वविक्रमी सांगीतिक सोहळ्याचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

हिंदी चित्रपटसृष्टीतील अजरामर संगीतकार, पंचमदा म्हणून लोकप्रिय असलेले आर.डी.बर्मन यांच्या जयंतीनिमित्त कोल्हापुरात एक आगळा - वेगळा विश्वविक्रमी गायन सोहळा नुकताच दिमाखात संपन्न झाला. कोल्हापूर मेडिकल असोसिएशन, इंडियन मेडिकल असोसिएशनची सांस्कृतिक समिती महाराष्ट्र राज्य आणि सरगम म्युझिकल ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने आर.डी.बर्मन यांनी संगीतबद्ध केलेली व गायलेली १०० गाणी सलग, नॉन-स्टॉप सादर करण्याचा विक्रम कोल्हापूर




मेडिकल असोसिएशन संगीत हॉल येथे नोंदवला गेला.

कार्यक्रमाचे उद्घाटन आयएमए सांस्कृतिक समिती महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते धन्वंतरी पूजन व दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी कोल्हापूरच्या महापौर रूपाराणी निकम, डॉ.आशा जाधव, आरोग्य उपसंचालक डॉ.डी.ए.पाटील, कोल्हापूर मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.ए.बी.पाटील, सचिव डॉ.अजय आडनाईक, डॉ.अरविंद कस्तुरे, नगरसेवक शिवाजी कवाले यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटनपर भाषणात डॉ.राजेश इंगोले म्हणाले, कोल्हापूर हे छत्रपती शाहू महाराजांच्या पुण्यस्पर्शाने पावन झालेले, मराठी चित्रपटसृष्टीचे माहेरघर आहे. एकेकाळी कोल्हापूर चित्रपटसृष्टीने संपूर्ण महाराष्ट्रावर अधिराज्य केले. हाच सांस्कृतिक वारसा कोल्हापूर मेडिकल असोसिएशनचे डॉक्टर व सांस्कृतिक मंडळाचे सदस्य इमाने-इतबारे जपत आहेत, ही अभिमानाची गोष्ट आहे. ही चळवळ टिकली पाहिजे, रूजली पाहिजे, वाढली पाहिजे आणि त्यातून एक नवा आयाम निर्माण झाला पाहिजे. आजच्या धावपळीच्या युगावर भाष्य करताना डॉ.इंगोले पुढे म्हणाले, उद्योग-धंदे, नोकरी सांभाळताना आपण स्वतःकडे, कुटुंबाकडे आणि आपल्या छंदांकडे दुर्लक्ष करतो. त्यातूनच मानसिक थकवा, उद्विग्नता आणि ताण-तणाव वाढतो. मानसशास्त्रीयदृष्ट्या प्रत्येकाने आपल्यातील सुप्त कला जोपासली पाहिजे. नोकरी-व्यवसाय तुम्हाला ◀◀ पान ३ वर

# सांची बुध्द विहारात जेष्ठ पौर्णिमा उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

शहरापासुन जवळच आसलेले सांची बुद्ध विहार , डॉ आंबेडकर भवन केसापुरी वसाहत येथे भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन भगवान बुद्धाच्या जिवनातील पौर्णिमांचे महत्व जाणुन वर्षाच्या बाराही पौर्णीमा विविध उपक्रमाने साजरा केल्या जातात याचाच एक भाग म्हणुन जेष्ठ पौर्णिमा मोठ्या उत्साह साजरी करण्यात आली या निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्व च्या महिला जिल्हा अध्यक्षा कमलताई डोंगरे,जिल्हा संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते तसेच कार्यक्रमाचे प्रस्तावीक महिला तालुका अध्यक्षा मंदाताई साळवे यांनी केले.या ठिकाणी भारतीय बौद्ध महासभा बीड जिल्हा पुर्वच्या महिला अध्यक्षा कमलताई डोंगरे व संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे यांनी मार्गदर्शन केले यांनी बौद्ध धम्मातील जेष्ठ पौर्णीमेचे महत्व या विषयावर सखोल मार्गदर्शन केले,या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे,आशाताई मोरे,जिल्हा संघटक शोभाताई भोजने, सह परिसरातील धम्म उपासक उपासिका मोठ्या प्रमाणात उपस्थीत होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk